रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २५
www.ramprahar.com
सोमवार ११ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## राहुल गांधींच्या आरोपांचे निवडणूक आयोगाकडून खंडन



**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत मतदारयाद्यांमध्ये घोळ झाल्याचे सांगत केंद्रीय निवडणूक आयोगावर निशाणा साधला होता. त्यांनी कर्नाटकातील शकुन राणी या महिला मतदाराने दोनदा मतदान केल्याचा दावा केला होता. कर्नाटक निवडणूक आयोगाने मात्र हा दावा तथ्यहीन असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर आयोगाने राहुल गांधींना नोटीस पाठवत त्यांनी कोणत्या कागदपत्रांचे आधारे दुबार मतदानाचे आरोप केले ती कागदपत्रे देण्याची नोटीस पाठविली आहे, जेणेकरून त्याची चौकशी करता येईल, असे नोटिसीत म्हटले आहे. आयोगाने डिजिटल मतदारयाद्या दिल्या जात नसल्याचा आरोपही खोडून काढत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना अंतिम मतदायाद्या डिजिटल माध्यमातूनही उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे म्हटले आहे.

अंतरंग
मुंबई विद्यापीठाचा उत्तर रायगड युवा महोत्सव कर्जतला/२
बाल गोविंदांसाठी भाजपची ५१ हजारांची दहीहंडी अन् चषक/५
मांडवा येथील कुस्ती स्पर्धेत कल्याणचा आखाडा विजेता/८

# देशातील सर्वात लांब नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसने रचला इतिहास

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते उद्घाटन

**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील नागपूर (अजनी) ते पुणेदरम्यान धावणारी वंदे भारत एक्सप्रेस आता देशातील सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत ट्रेन ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रविवारी (दि. १०) या सेवेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला, ज्यामुळे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांना जलद, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बंगळुरूच्या



केएसआर रेल्वेस्थानकावरून तीन नवीन वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांचे उद्घाटन केले. यामध्ये प्रत्यक्ष हिरवा झेंडा दाखवून सुरू करण्यात आलेल्या बंगळुरू-बेळगाव ट्रेन आणि आभासी पद्धतीने सुरू करण्यात आलेल्या श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसर आणि अजनी (नागपूर)-पुणे ट्रेन्सचा समावेश आहे. या कार्यक्रमाला नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व परिवहनमंत्री नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसमुळे महाराष्ट्रातील दोन मोठ्या शहरांमधील अंतर आता केवळ १२ तासांत पार करता येणार आहे. या सेवेमुळे स्थानिक अर्थव्यवस्था, शिक्षण, व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला नवे बळ मिळणार आहे. प्रवाशांसाठी ही सेवा आधुनिक भारताच्या प्रगत रेल्वे व्यवस्थेचे प्रतीक ठरली आहे.



# तळोजात भाजपची तिरंगा पदयात्रा

■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह नागरिकांचा सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष तळोजा मंडळाच्या वतीने तिरंगा पदयात्रेचे आयोजन रविवारी (दि. १०) करण्यात आले होते. देशभक्तीचा उत्सव साजरा करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह असंख्य नागरिक या तिरंगा पदयात्रेत सहभागी झाले होते.

माजी सैनिक राजेश कदम यांच्या हस्ते भारतमाता आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पूजन करून या पदयात्रेला सुरुवात झाली. भाजप तळोजा फेज १ कार्यालयापासून सुरू झालेल्या तिरंगा पदयात्रेत आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, सरचिटणीस विनोद घरत, अंकुश पाटील, उपाध्यक्ष निर्दोष केणी, सुरेश पाटील, समीर गोंधळी, चिटणीस प्रिया हनुमंते, नितीन भोईर, शिल्पा गायकवाड, सचिन वास्कर, विनेश कदम, शशिकांत गोंधळी, माजी नगरसेवक पापा पटेल, किरण दाभणे, रविकांत म्हात्रे, अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मन्सूर पटेल, महिला मोर्चा अध्यक्ष आशा बोरसे, युवा मोर्चा अध्यक्ष आशिष कडू, विशाल घरत, निलेश दाढावकर, रूशाल पाटील, संकेत वगरे, प्रभाग अध्यक्ष दीपक पाटील, कृष्णा पाटील, जगदीश घरत, पं.स. अध्यक्ष प्रकाश खैरे, माजी सैनिक रमेश कदम यांच्यासह नागरिक, युवक, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गव्हाण येथील आरोग्य शिबिराचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल आणि उरण मतदारसंघात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. भाजप गव्हाण जिल्हा परिषद, वहाळ आणि गव्हाण पंचायत समितीच्या वतीने रविवारी (दि. १०) गव्हाण ग्रामपंचायत हॉलमध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

आरोग्य शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी पं.स. सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजप पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, उलवे नोड १ अध्यक्ष निलेश खारकर, उलवे नोड २चे अध्यक्ष विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाणच्या माजी सरपंच जिज्ञासा कोळी, माजी उपसरपंच सचिन घरत, माजी ग्रामपंचायत सदस्य हेमंत पाटील, मीनाक्षी पाटील, कामिनी कोळी, शैलेश भगत, महिला मोर्चाच्या विभागीय अध्यक्ष निकिता खारकर, युवा मोर्चा पश्चिम मंडळ अध्यक्ष धीरज ओवळेकर, गव्हाण जि.प. अध्यक्ष वितेश म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या शिबिरात नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

## निवडक

### भारतीय विमानांना हवाई क्षेत्र बंद केल्यामुळे पाकचे नुकसान

**नवी दिल्ली :** पहलगाम हल्ल्यानंतर भारताच्या निर्णयांना प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने भारतीय विमान कंपन्यांच्या विमानांना त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले होते, मात्र त्यामुळे पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाला (पीएए) अवघ्या दोन महिन्यांत १,२४० कोटी रुपयांपेक्षा अधिकचा तोटा झाला आहे. दरम्यान, पाकिस्तानने भारतीय विमानांसाठी हवाई क्षेत्राची बंदी २४ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे.

### मनी लॉण्डरिंगप्रकरणी रॉबर्ट वाड्रा यांच्या अडचणीत वाढ

**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांचे पती आणि व्यावसायिक रॉबर्ट वाड्रा यांच्या अडचणी वाढणार आहेत. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मनी लॉण्डरिंग प्रकरणात रविवारी (दि.१०) वाड्रांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले आहे. वाड्रा यांनी दोन कंपन्यांद्वारे ५८ कोटी रुपयांचे बेकायदेशीर उत्पन्न मिळवले आणि ती मालमत्ता खरेदी करण्यासाठी आणि व्यावसायिक कर्जांची परतफेड करण्यासाठी वापरली, असा त्यांच्यावर आरोप आहे.

# करंजाडेत गार्डन, वाचनालय, आसनव्यवस्थेचे लोकार्पण

## नवीन पुलाचे काम लवकरच सुरू होणार -आमदार महेश बालदी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलजवळील करंजाडे सेक्टर ४मधील टाटा पॉवर हाऊस येथे दोन गार्डन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय आणि ज्येष्ठ नागरिक संघासाठी केलेल्या आसनव्यवस्थेचे लोकार्पण उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी आणि विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते रविवारी (दि. १०) करण्यात आले.

ग्रामपंचायतीच्या वतीने विविध विकासकामे करून सरपंच मंगेश शेलार यांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या शब्द पाळला आहे.

पनवेलच्या उरण नाका येथून करंजाडे येथे ये-जा करताना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे करंजाडेवासीयांना लवकरच



एक नवीन पूल मिळणार आहे. त्याचे काम पाच महिन्यात सुरू होणार असल्याचे या वेळी आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

करंजाडेची ओळख ही झपाट्याने वाढणारे शहर म्हणून अशी आहे. येथील वाढते नागरीकरण लक्षात घेत जनतेच्या भल्यासाठी कसे चांगले काम करता येईल हा प्रयत्न नेहमीच आपले आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून होताना दिसतो, असे आमदार विक्रांत पाटील यांनी सांगितले.

करंजाडे येथील रस्ते, सीसीटीव्ही कॅमेरे, गार्डन आणि इतर गोष्टींचे दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. रस्ते चकाचक झाले आहेत आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत, तर पाण्याचा प्रश्नदेखील ८० टक्के सुटला असल्याचे सरपंच मंगेश शेलार यांनी सांगितले.

या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते कर्णा शेलार, सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, संदेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनील भोईर, तुषार नागे, कृष्णा पाटील, सत्यजित पाटील, विक्रम मोरे, मनोज घुगे, बंटी प्रबळकर, प्रदीप गावडे, निनाद मुंबईकर, सुषमा मयेकर, रश्मी गुप्ता, ज्योती तातरे, सत्यजित पाटील, कृष्णा कातले यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. विकासकामांबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# रायगडात तीन अपघातांमध्ये एक ठार, १९ जण जखमी

**महाड, खालापूर, पनवेल : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात रविवारी (दि. १०) महाड, खोपोली आणि पनवेलजवळ झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातांमध्ये एक महिलेचा मृत्यू, तर १९ जण जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत.

महाड आगारातून सुटलेली महाड-सांदोशी आणि माणगाववरून आलेली माणगाव-किल्ले रायगड या दोन एसटी बसेसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात चालकासह १० जण जखमी झाले आहेत. जखमींना पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

दुसरा अपघात मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर खोपोली बायपास येथे नवीन बोगद्यात झाला. यामध्ये पाच जण जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त कुटुंब पुणे येथून मुंबईला कारने जात होते. त्यांच्या कारला ट्रेलरने धडक दिली. यातील एका महिलेच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तिला पुणे येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. इतर जखमींवर खोपोली पालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

एक्सप्रेस वेवरच पनवेल हद्दीत क्रूझर गाडीचालकाने बलेनो गाडीला धडक दिली. त्यानंतर बलेनो गाडी उलटली. या अपघातात बलेनोतील एक महिला ठार, तर चार जण जखमी झाले आहेत. हे पाच प्रवासी व चालक असे सहा जण मुंबई ते लोणावळा असा प्रवास करीत होते. जखमींना एमजीएम रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

(सविस्तर वृत्त पान २, ५ वर..)

# साळाव स्कूलच्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रपती भवनात रक्षाबंधन

**मुरूड, अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शनिवारी राष्ट्रपती भवनात देशभरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरे केले. रायगडच्या अलिबाग तालुक्यातील साळाव येथील जिंदाल स्कूलच्या चार विद्यार्थ्यांनाही राष्ट्रपती भवनात रक्षाबंधनाची संधी मिळाली.

नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात झालेल्या या कार्यक्रमासाठी साळावमधील जिंदाल स्कूलच्या कनक ओसवाल, उमर करणी, अद्रिता चक्रवर्ती आणि प्रीती लाटे या विद्यार्थ्यांची



निवड झाली होती. विद्यार्थ्यांसोबत प्राचार्य मुकेश ठाकूर आणि जेईटी प्रमुख डॉ. भावेश भालेराव उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी राष्ट्रपतींना राखी बांधून शुभेच्छा दिल्या, तर राष्ट्रपतींनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांचे कौतुक केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# ठाणे वर्षा मॅरेथॉनमध्ये धर्मेंद्र, रविना विजेते



**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात पुण्याचे एएसआयच्या धर्मेंद्र याने १ तास ७ मिनिटे आणि ४१ सेकंद वेळेसह २१ किमीचे अंतर पार करत अव्वल स्थान पटकावले, तर महिला गटात नाशिकच्या रविना गायकवाडने एक तास २५ मिनिटे आणि ४६ सेकंद वेळ घेत शर्यत पूर्ण केली. या स्पर्धेचे यंदा ३१वे वर्ष होते.

ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा अ‍ॅथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय वर्षा मॅरेथॉन घेण्यात येते, परंतु या स्पर्धेला कोरोनापासून गेली पाच वर्षे खंड पडला होता. या स्पर्धेत मुंबई ठाण्यातीलच नव्हे; तर महाराष्ट्रातून अनेक स्पर्धक सहभागी होत असतात. त्याचप्रमाणे आर्मीमधील नामवंत खेळाडू सहभागी होतात. देश आणि जागतिक पातळीवर धावपट्टू निर्माण करणे या उद्देशातून ही स्पर्धा घेण्यात येते. पाच वर्षांच्या खंडानंतर यंदा रविवारी (दि. १०) या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत सुमारे २५ हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरुष गटाच्या आणि लता शिंदे यांनी महिला गटाच्या स्पर्धेला झेंडा दाखवला. त्यानंतर टप्प्याटप्प्याने एकूण १२ गटातील स्पर्धांचा शुभारंभ महापालिका मुख्यालयासमोरील चौकातून करण्यात आला. सहभागी धावपटूंचा उत्साह पाहून मॅरेथॉनला झेंडा दाखवल्यानंतर स्वत: उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही मॅरेथॉनमध्ये धावण्याचा आनंद घेतला. त्यांनी धावपटूंसमवेत काही अंतर धावून त्यांचा उत्साह वाढवला, तर परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रवींद्र फाटक यांच्या हस्ते विजेत्या धावपटूंना गौरविण्यात आले.

# आरावी समुद्रात बुडून एकाचा मृत्यू

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील आरावी येथील समुद्रात बुडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. सचिन काशिनाथ होडवे (वय ४३, रा. बोरीवली, मुंबई) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

सचिन होडवे समुद्राच्या पाण्यात उतरले, पण पाण्याची खोली अंदाज न आल्याने ते लाटांमध्ये खेचले गेले आणि क्षणभरातच आनंदाचा क्षण शोकांतिकेत बदलला. स्थानिकांच्या मदतीने त्यांना किनाऱ्यावर आणण्यात आले, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. या घटनेची माहिती सरपंच अमोल पुसाळकर यांनी श्रीवर्धन पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मृतदेह श्रीवर्धन उपजिल्हा रुग्णालय येथे पाठवला.

# सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सर्वोत्तम यंत्रणा व तंत्रज्ञान महाराष्ट्राकडे -सीएम

**नागपूर : प्रतिनिधी**

काही समाज विघातक लोकांनी समाजमाध्यमांवरून जातीय द्वेषमूलक चिथावणी दिल्यामुळे दंगली उसळलेल्या आपण पहिल्या आहेत. अशा गुन्हेगारीला आला घालण्यासाठी आता जगातील सर्वोत्तम यंत्रणा व तंत्रज्ञान महाराष्ट्राकडे आहे. अशा लोकांना हुडकून त्यांच्यावर तात्काळ कारवाईसाठी 'गरुड दृष्टी' हे टूल्स महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




नागपूर पोलीस विभागाच्या वतीने पोलीस भवन येथे 'गरुड दृष्टी' सोशल मीडिया मॉनिटरिंग व सायबर इंटेलिजन्स प्रकल्पाबाबत सादरीकरण आणि विविध सायबर आर्थिक गुन्ह्यांच्या तपासातून प्राप्त झालेल्या तब्बल १० कोटी रुपये रकमेच्या वितरण समारंभात ते बोलत होते. त्यांच्या हस्ते या रकमा फसवणूक झालेल्या संबंधित व्यक्तींना वितरित करण्यात आल्या. यावेळी पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल, सहपोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अतिरिक्त पोलीस आयुक्त सर्वश्री वसंत परदेशी, राजेंद्र दाभाडे, शिवाजी राठोड व वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

स्वतःचे विचार मांडण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून सोशल मीडियाचा होणारा वापर उत्तम असला तरी काही समाज विघातक प्रवृत्ती द्वेष पसरवणे, धमक्या देणे, हेट स्पीच, फेक न्यूज, अंमली पदार्थांची तस्करीसाठी या प्लॅटफॉर्मचा वापर करताना आपण पाहतो. यातील आर्थिक फसवणुकीचे प्लॅटफॉर्म बहुतांश परदेशी ऑपरेटर चालवतात. त्यामुळे सर्वांनी सावध असले पाहिजे. आपल्या मोबाईलवर कोणत्याही प्रकारच्या येणाऱ्या ऑफर्स आर्थिक फसवणुकीसाठी टाकलेले जाळे आहे हे लोकांनी लक्षात घेतले पाहिजे. जर आपली आर्थिक फसवणूक झाली आहे हे लक्षात आल्यास शक्य तेवढ्या लवकर १९३० व १९४५ या क्रमांकावर नागरिकांनी संपर्क साधावा असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सोशल मीडिया माध्यमाद्वारे फसवणुकीच्या घटना रोखण्यासाठी 'गरुड दृष्टी' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून या प्लॅटफॉर्मवरील गुन्हेगारी हालचाली शोधून काढणे व त्यांचा मागोवा घेणे शक्य होईल. भविष्यात या टूल्सचा विस्तार आणि क्षमता वाढविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्या लोकांना त्यांचे पैसे मिळाले त्या व्यक्तींचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले. पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल यांनी प्रस्ताविक केले. उपायुक्त लोहित मतानी यांनी कार्यक्रमापूर्वी गरुड दृष्टी बाबत सादरीकरण केले.

## दहीहंडीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोविंदा पथकांना संधी -वैकुंठ पाटील



**पेण : प्रतिनिधी**

दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोविंदा पथकांना संधी देण्याचे काम होणार असून यातुन आपली संस्कृती व परंपरा टिकविण्याचे काम होत असल्याची माहिती पत्रकार परिषदेत वैकुंठ पाटील मित्रमंडळाचे अध्यक्ष युवा नेते वैकुंठ पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मित्रमंडळाच्या वतीने पेण विधानसभा मतदार संघात ४ ठिकाणी दहीहंडी उत्सव साजरा होत असून यासाठी मंडळाच्या वतीने आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस मिलिंद पाटील, सोपान जांभेकर, राजेंद्र साळवी सर, श्रीकांत पाटील, महेश म्हात्रे, विजय गायकवाड, रविकांत म्हात्रे, शेखर पाटील, सदाशिव म्हात्रे, गोरख पाटील, हिरामण भोईर, महेश भिकावले, आनंद लाड आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यंदा पेणमध्ये तांबडशेत, वडखळ नाका, वाशी नाका, तसेच नागोठणे भागात हा उत्सव साजरा करण्यात येणार असून या माध्यमातून पेण, रोहा,सुधागड तालुक्यातील गोविंदा पथकांना संधी मिळण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असे वैकुंठ पाटील म्हणाले. यावर्षी विशेष म्हणजे महिला गविंदा पथकांना संधी मिळणारं आहे. या वर्षी जवळजवळ १० हजार टी शर्ट चे वाटप करण्यात आले असून ठिकठिकाणी २०० स्वयंसेवक कार्यरत रहाणार आहेत. गोविदा पथकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून यशवंती हायकर्स (खोपोली) यांचे सहकार्य लाभणार असल्याचे माहिती यावेळी वैकुंठ पाटील यांनी दिली.

यावेळी बोलताना मंडळाचे सदस्य मिलिंद पाटील यांनी सांगितले कि, दहहंडी उत्सवाला वाढता पाठींबा मिळत असून या उत्सवाला जास्ती जास्त चालना मिळवून देण्याच्या उद्देशाने वैकुंठ पाटील मित्रमंडळाच्या वतीने यंदा ४ ठिकाणी हा उत्सव होत असून सलामी देणाऱ्या पथकांना सुद्धा विशेष पारितोषिक ठेवण्यात अली असून खारेपाट भाग, हमरापूर विभाग, वडखळ विभागातील नागरिकांनाही या उत्सवाचा आनंद लुटण्यात येणार आहे.

## मुंबई विद्यापीठाचा उत्तर रायगड युवा महोत्सव कर्जतला

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या उत्तर रायगड विभागाचा युवा महोत्सवाचा शुभारंभ कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात करण्यात आला. या महोत्सवात रायगड जिल्ह्यातील २७ महाविद्यालयातील सुमारे साडे बाराशे विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. एकूण ३२ इव्हेंट या युवा महोत्सवात होत आहेत.

मुंबई विद्यापीठाचे ५८ व्या युवा महोत्सवाचे आयोजन कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी



महाविद्यालय आणि उरण कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. युवा महोत्सवाचे उदघाटन मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक समन्वयक डॉ. निलेश सावे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे सदस्य झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य रमेश ठाकूर, विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. वाल्मिक गर्जे, डॉ. पराग कारुळकर, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. निलोफर खान आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

उदघाटक डॉ. निलेश सावे यांनी, 'युवा महोत्सव म्हणजे एक वेगळी ऊर्जा अस्ते. सहभाग घेणे सोपे असते मात्र आयोजन करणे फार कठीण असते. या महाविद्यालयाने युवा महोत्सवाचे शिवधनुष्य तिसऱ्यांदा पेलले आहे. हे अत्यंत कौतुकास्पद आहे. या महोत्सवात सर्वच ठिकाणी पारदर्शकता असेल. कुठेही गडबड होणार नाही.' असा विश्वास दिला.

या युवा महोत्सवात म्युझिक, फाईन आर्ट, थिएटर साहित्य, वक्तृत्व, वाद विवाद, नृत्य, गायन तसेच रांगोळी, मेहंदी आदी स्पर्धे चे प्रकार आहेत

## भालिवडी आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थिनींनी राज्यपालांना बांधल्या राख्या



**नेरळ : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील भालिवडी या छोट्याशा गावातील शासकीय आश्रमशाळेच्या पाच आदिवासी विद्यार्थिनींनी रक्षा बंधनाचा सण अविस्मरणीय बनवत थेट मुंबईतील राजभवन गाठले आणि राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना राखी बांधण्याचा मान मिळवला. ग्रामीण भागातील मुलींचा हा प्रवास शिक्षण, संस्कार, परंपरा आणि आत्मविश्वासाचा सुंदर संगम ठरला.

या उपक्रमामागे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेणचे प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांची दूरदृष्टी व संकल्पना होती, तर सहाय्यक प्रकल्प अधिकारी मारुती गायकवाड यांनी काटेकोर नियोजन आणि अचूक मार्गदर्शन करून संपूर्ण कार्यवाही यशस्वी केली.

शाळेचे प्राचार्य मोहन पडघन यांनी पायल साबळे, दीपाली लाडके (इ. १२ वी), निकिता वाघमारे, गीता निरगुडा (इ. १० वी) आणि समीक्षा कोकाटे (इ. ५ वी) या विद्यार्थिनींची निवड केली. सोबत शिक्षक श्रीमती तृप्ती खामकर आणि श्री. शिवाजी खामकर हे मार्गदर्शक म्हणून सहभागी झाले.

राजभवनात पोहोचल्यावर विद्यार्थिनींनी राज्यपालांना आदरपूर्वक राखी बांधली. त्यानंतर गीता निरगुडा हिने स्वतः काढलेले वारली चित्र सुंदर फ्रेम करून राज्यपालांना भेट दिले. ग्रामीण संस्कृती, कलेचा वारसा आणि आदिवासी परंपरेचा हा संगम पाहून राज्यपालांनी विद्यार्थिनींच्या प्रयत्नांचे मनापासून कौतुक केले.

### एक्सप्रेस वेवर दोन गाड्यांच्या अपघातात महिला ठार, चौघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर टोयोटा गाडीवरील चालकाने बलेनो गाडीस पाठीमागून धडक दिल्याने गाडी पलटी होऊन झालेल्या अपघातामध्ये गाडीतील महिला ठार, तर चार जण गंभीर जखमी झाले

अपघातग्रस्त टोयोटा कार नूरभालम खान (वय ३४ वर्षे) चालवत होता. सदर कारमध्ये चालकाव्यतिरिक्त आणखी ३ इसम व १ महिला होती. ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून मुंबई ते लोणावळा असे जात असताना, पनवेल जवळील कि.मी. ९/६०० येथे समोरील बलेनो कारला पाठीमागून ठोकर मारून, रस्त्याच्या डाव्या बाजूस असलेल्या सिमेंट ब्लॉकच्या दुभाजकाला धडकून पलटी झाली.

या अपघातात कारमधील महिला अस्फिया बानू मो. फरीद खान (वय २२ वर्षे) ही मयत झाली असून चालकासह चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

## एक हजार लोकांची बसण्याची व्यवस्था असलेले सभागृह बांधणार -आमदार थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याला क्रांतिकारकांचा इतिहास असल्याने मानीवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारकात एक हजार लोक बसतील असे भव्य सभागृह बांधण्यात येईल. हुतात्मा स्मारक हे स्फूर्तीस्थान व्हावे. यासाठी तयार असलेला आराखडा नियोजनबद्ध साकारला जाईल. असे आश्वासन आमदार महेंद्र थोरवे यांनी दिले.



ऑगस्ट क्रांती दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रायगड जिल्हा परिषद, कर्जत पंचायत समिती, शिक्षण विभाग, मानीवली ग्रामपंचायत आणि हुतात्मा स्मारक समिती मानीवली यांच्या माध्यमातून क्रांती दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला खासदार श्रीरंग बारणे, नायब तहसीलदार सचिन राऊत, कर्जत तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे तसेच हुतात्म्यांचे वारस विठ्ठल पाटील, वामन गवळी, अनसूया जामघरे, शरद भगत, केतकी भडसावळे म्हसकर, माजी सभापती राहुल विशे, माजी उप सभापती अरविंद पाटील, माजी सरपंच रवींद्र झांजे, स्मारक समितीचे अध्यक्ष प्रवीण डायरे, उपाध्यक्ष जितेंद्र गवळी, माजी सरपंच लहुदास डायरे, पंचायत समिती विस्तार अधिकारी उज्वला भोसले, ग्रामपंचायत अधिकारी पांडुरंग म्हसे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला हुतात्म्यांना पोशिर येथील श्रमजीवी विद्यालय चे एस सी सी चे विद्यार्थी आणि माथेरान व्हॅली स्कूल चे स्काऊटचे विद्यार्थ्यांनी सलामी दिली. त्यानंतर मानीवली येथील जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केल्यावर हा सोहळा सुरू झाला. हुतात्मा हिराजी पाटील यांच्या अर्धपुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. खासदार श्रीरंग बारणे यांनी वारकऱ्यांची मागणी असलेली दादर पंढरपूर गाडीला कर्जत येथे अधिकृत थांबा देण्याबाबत रेल्वे मंत्री यांची भेट घेणार असल्याचे आश्वासन भाषणात दिले.

# खवले मांजर आणि त्याचे महाराष्ट्रातील अस्तित्व

**माणगाव : बातमीदार**

खवले मांजर, ज्याला इंग्रजीत **इंडियन पांगोलिन**म्हणतात, हा एक अत्यंत दुर्मिळ आणि रहस्यमयी प्राणी आहे. त्याची वैशिष्ट्यपूर्ण रचना, म्हणजेच संपूर्ण शरीरावर असलेली मजबूत खवले ही त्याची ओळख पटवणारी खास खूण आहे. हे खवले केराटिनपासून बनलेले असतात, जे मानवी नखांप्रमाणेच असते. ही संरचना त्याला निसर्गात त्याच्या नैसर्गिक शिकाऱ्यांपासून संरक्षण देते.

खवले मांजर हे मुख्यतः निशाचर प्राणी आहेत, म्हणजेच ते रात्री सक्रिय असतात. हे प्राणी मुख्यत्वे जमीन खणून त्यामध्ये राहतात आणि त्यांच्या आहारामध्ये मुंग्या व वाळवी आणि इतर कीटक प्रमुख आहेत. आपल्या लांब चिकट जीभेच्या साहाय्याने हे प्राणी वारुळांमधून मुंग्या आणि वाळवी तसेच बिळांमधून कीटक बाहेर काढून खातात. त्यांना दात नसतात, त्यामुळे त्यांची खाण्याची पद्धत अनोखी असते. लांब जिभेला चिकट लाळेच्या साहायाने चिकटलेले कीटक जीभेच्याच साहाय्याने गिळले जातात.

महाराष्ट्रातील कोकण भागात विशेषतः सिंधुदुर्ग, रत्नागिरी, आणि रायगड जिल्ह्यांतील जंगलांमध्ये खवले मांजरचे अस्तित्व प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत टिकून



आहे. कोकण परिसर सोडूनही पुणे आणि इतर काही जिल्ह्यांमधून खवले मांजराच्या नैसर्गिक नोंदी महाराष्ट्रातून करण्यात आल्या आहेत. कोकणाची घनदाट जंगलं, भरपूर कीटक व ओलसर हवामान हे या प्राण्याच्या निवासासाठी अनुकूल मानले जाते. पूर्वी हे प्राणी मोठ्या संख्येने होते परंतु आता नष्ट होत असलेले अधिवास, मोठ्या प्रमाणात होत असलेला कीटकनाशकांचा वापर, आणि मोठ्या प्रमाणावर तस्करी यामुळे खवले मांजराचा नामशेष होण्याच्या मार्गावर धोक्यात असलेल्या प्रजातींच्या यादीमध्ये समावेश झालेला आहे.

खवले मांजराला अनेक धोके सामोरे जावे लागत आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याच्या खवल्यांची चोरटी तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्याची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. आंतरराष्ट्रीय तस्करांची मोठी टोळी खवले मांजरांच्या तस्करीमागे सक्रिय आहेत, मोठ्या स्तरावर ह्या तस्करीच्या जाळ्यांना व टोळ्यांना कशा प्रकारे आळा घालता येईल यासाठी अनेक जागतिक पर्यावरण संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्थांचे प्रयत्न सुरु आहेत. कोकणात पूर्वी ह्याची मासासाठीदेखील मोठ्या प्रमाणावर शिकार झालेली आहे. अनेकदा औषधी गुणधर्म असल्याच्या गैरसमजातून याच्या खवल्यांचा वापर केला जातो, ज्यामुळे हा प्राणी अधिक संकटात सापडला आहे. तसेच जंगलांची झपाट्याने होणारी तोड आणि मानवी अतिक्रमणामुळे त्याच्या निवासस्थानीही बाधा निर्माण झाली आहे.

भारतात खवले मांजर हे वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार अनुसूची-ख अंतर्गत येते, खवले मांजराला कायद्याने सर्वोच्च दर्जाचे संरक्षण प्राप्त आहे, काही संवर्धनातम्क धोरणांमुळे व कायद्याच्या जनजागृतीमुळे थोड्याफार प्रमाणात खवले मांजराला सुरक्षा मिळाली आहे.

कोकणातील स्थानिक समाज आणि पर्यावरणप्रेमी संघटनांनी याच्या संवर्धनासाठी विविध पावले उचलली आहेत. जनजागृती, संशोधन आणि वनविभागाच्या प्रयत्नांमुळेदेखील या प्राण्याच्या अस्तित्वाबाबत लोकांमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात जागरूकता निर्माण होऊ लागली आहे. स्थानिकांकडून खवले मांजराच्या संरक्षणाच्या अलीकडील काळात काही सकारात्मक रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातून घटना समोर आल्या आहेत.

खवले मांजराचे निसर्गात अनन्यसाधारण महत्व असून ते नैसर्गिक परिसंस्थांचा एक महत्त्वाचा भाग आहे, नैसर्गिक कीटक नियंत्रक आणि अधिवास सुदृढ राखण्यासाठी निसर्गात मोलाचे काम खवले मांजर करते त्यामुळे एकूणच, खवले मांजराचे जतन करणे सर्वांचे कर्तव्य आहे.

## निवडक

### देशी दारूचा साठा हस्तगत

**पनवेल :** शहर पोलिसांच्या विशेष पथकाने पळस्पे, पुष्पक नगर व उसर्ली येथे टाकलेल्या धाडीमध्ये हजारो रुपये किमतीचा देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नेमलेल्या विशेष पथकाने पळस्पे, पुष्पक नगर व उसर्ली येथे टाकलेल्या धाडीमध्ये हजारो रुपये किमतीचा देशी दारूचा साठा हस्तगत केला आहे व त्यांच्या विरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गाड्यांच्या सायलेन्सरची चोरी



**पनवेल :** पनवेल शहरातील तक्का गाव परिसरात गाड्यांचे सायलेन्सर चोरीला जाण्याचे प्रकार वाढल्याने वाहन मालक चांगलेच त्रस्त झाले आहेत. येथील तिघा जणांच्या गाड्यांचे सायलेन्सर चोरीला गेले आहेत. चोरटे परिसरात सीसी टीव्ही फुटेज मध्ये कैद झाले आहेत. या बाबतची माहिती पोलीस ठाण्याला सुद्धा देण्यात आली आहे. वाढत्या चोऱ्यांच्या घटना मुळे आता ग्रामस्थांयाना व गावातील यूवकांना आता रात्री जागता पहारा ठेवणे गरजेचे झाले आहे.

### अल्पवयीन युवकाचे अपहरण

**पनवेल :** डेरीवली येथे राहणाऱ्या एका अल्पवयीन युवकाचे



अपहरण करण्यात आल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. सनी शिवाजी पाटील (वय १६) राहणार रूम नंबर ३०३ पवितर निवास डेरवली, वर्ण सावळा, उंची ५.४ इंच, केस काळे वाढलेले, बाधा सडपातळ असून अंगात नेसून राखाडी टी शर्ट व काळी जिन्स पॅन्ट, पायात चप्पल, मराठी भाषा बोलतो याचे कोणीतरी अज्ञातांनी अपहरण केले आहे. पुढील तपास पोउपनि बाळासाहेब फड हे करीत आहेत.

### पूजेनिमित्त संगीत जोड भजन

**पनवेल :** वंदे मातरम टॅक्सी चालक-मालक संघटना आयोजित श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन ११ ऑगस्ट रोजी गाढेश्वर मंदिर, पनवेल येथे करण्यात आले आहे. सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत संगीत भजन, १२ ते १ वाजेपर्यंत भजन आणि दुपारी २ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत संगीत जोड भजन कार्यक्रम होणार आहे. या वेळी उपस्थित राहण्याचे आवाहन टॅक्सी चालक-मालक संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

# पनवेल पोलिसांकडून ३८ गंभीर गुन्ह्यांची उकल

## जुलै महिन्यात ५७ जणांना अटक, ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याने जुलै महिन्यामध्ये एक उल्लेखनीय कामगिरी करत ३८ गंभीर गुन्हे उघडकीस आणून त्यातील ५७ जणांना गजाआड केले आहे. पोलिसांनी उघडकीस आणलेल्या गुन्ह्यांमध्ये चोरी, जबरी चोरी, घरफोडी, फसवणूक आणि अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांचा समावेश असून, पोलिसांनी त्यांच्याकडून एकूण ७१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवायांमध्ये पोलिसांनी पनवेल येथील एका कुटुंबाला शेतातून गुप्तधन काढून देण्याच्या बहाण्याने त्यांचे ३९ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोने आणि रोख रकमेची फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबाला पनवेल शहर पोलिसांनी कोल्हापूर जिल्ह्यातून अटक करून त्याने फसवणूक केलेले सर्व दागिने व रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. दुसऱ्या गुन्ह्यात आयफोन चोरुन नेणाऱ्या चोरट्याचा पाठलाग करत ओडिशातील त्याच्या मूळगावी जाऊन अटक केली. या कारवाईत पोलिसांनी पुराने वेढलेल्या गावात फायर ब्रिगेडच्या मदतीने त्याला ताब्यात घेत त्याच्याकडून



सात लाख २४ हजार ५०० रुपये किमतीचे पाच आयफोन जप्त केले.

पनवेल बसस्थानक परिसरात प्रवाशांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने लुटणाऱ्या टोळीला अटक करत दोन लाख २७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, रेल्वे स्थानक परिसरात बॅग चोरणाऱ्या टोळीतील पाच आरोपींना अटक करून ११ लाख ६७ हजार रुपये किमतींचा मुद्देमाल हस्तगत केला. त्यातून २ गुन्हे उघडकीस आले. नवी दुकानांचे शटर उचकटून चोरी करणाऱ्या टोळीला ताब्यात घेत त्यांच्याकडून चार लाख ९५ हजार ८१० रुपये किमतीचे ४५ मोबाईल जप्त करत पोलिसांनी चार गुन्हे उघडकीस आणले.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते आणि पनवेल विभागाचे सहाय्यक आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली या साऱ्या कारवाया पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, पोनि. (गुन्हे) शाकीर पटेल, पोनि. (प्रशासन) अभिजित अभंग यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कामगिरी यशस्वी केली.

> **पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या या यशस्वी कामगिरीचे संपूर्ण श्रेय आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाला आणि पोलीस पथकाच्या अथक परिश्रमाला जाते. वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळेच आम्ही एका महिन्यात ३८ गुन्हे उघडकीस आणून ५७ आरोपींना अटक करत त्यांच्या ताब्यातून ७१ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करू शकलो.**
> **-नितीन ठाकरे, वपोनि, पनवेल शहर पोलीस ठाणे**

## कारच्या धडकेने रिक्षाचालक जखमी

**पनवेल :** कारने रिक्षाला दिलेल्या धडकेत झालेल्या रिक्षा अपघातात रिक्षा आणि कारचे नुकसान झाले. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रिक्षा चालक जखमी झाला आहे.

नवीन पनवेल येथील रवी लोहार हे रिक्षा (एमएच ४६ एसी २११९) घेऊन पनवेल रेल्वे स्टेशनतवरून रात्री बाराच्या सुमारास इंडियाबुल सोसायटी कोनगाव येथे गेले. पॅसेंजरला सोडून ते पनवेल रेल्वे स्टेशनकडे येत असताना रात्री दीडच्या सुमारास जुना मुंबई पुणे हायवेवर निसर्ग हॉटेल समोर कोन येथे पाठीमागून वेगाने आलेल्या कार (एमएच १४ के डब्ल्यू ५२११) वरील चालकाने रिक्षाला ठोकर मारली. या अपघातात रिक्षाचालक रवी लोहार हे रस्त्यावर पडून त्यांची रिक्षा बाजूला असलेल्या वाहनाला धडकली. या अपघातात रिक्षाचे आणि दुसऱ्या वाहनाचे नुकसान झाले. या अपघातात रवी लोहार हे जखमी झाले असून अपघातानंतर कारचालक पळून गेला.

## कामोठे येथे हॉलिस्टिक सेंटरचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अनाहत आरोग्य हॉलिस्टिक सेंटरचे उद्घाटन लोकप्रिय बालकलाकार अर्जुनी हिच्या हस्ते आणि भाजप सोशल मीडिया जिल्हा संयोजक ओबीसी मोर्चाचे प्रसाद हनुमंते यांच्या उपस्थितीत झाले.

अनाहत हिलिंग सेंटरमध्ये आक्युपंचार, आक्युप्रेशर, कपिंग, मेडिकल योग आणि साउंड हिलिंगसह गुडघेदुखी, मानदुखी, स्नायूंचे आजार, मायग्रेन, सांधेदुखी, फ्रोजन शोल्डर, स्पॉन्डायलोसिस, टेनिस एल्बो, टाचदुखी, डिप्रेशन, स्ट्रेस मॅनेजमेंट, झोपेचे विकार अशा अनेक तक्रारींवर विना औषध व विना साइड इफेक्ट उपचार केले जातात. तसेच, आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित योग वर्गांची



सुविधाही उपलब्ध आहे.

हे सेंटर कामोठे सेक्टर २२, रिद्धी-सिद्धी सोसायटी, प्लॉट क्रमांक १११ येथे सुरू करण्यात आले आहे. बालवयातच शैक्षणिक क्षेत्रासोबत कला क्षेत्रातही उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या अर्जुनीने आपल्या बहुआयामी गुणांद्वारे प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे.

या कार्यक्रमाला योगतज्ज्ञ राजलक्ष्मी राव, रीना दत्तगुप्ता, जयश्री झा, अनुजा अय्यंगार, अक्युपंचर तज्ञ जायली तेरडे, ओम आय केअर ऑप्टिकलचे परेश तेरडे, ज्योत्स्ना चंदने, स्वानंद लाड, सुप्रसिद्ध भाऊ कोरडे मसालेचे मिलिंद कोरडे व मृणाल कोरडे, मेकअप आर्टिस्ट मानसी कोरडे, समाजसेवक व एन एस एस कन्सल्टन्सीचे एम.डी. सागर रोकडे आणि गोपाळ भोईर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी सेंटरच्या सायली कोरडे व शीतल वनगे यांनी बालकलाकार अर्जुनीचे मनापासून स्वागत केले.

## द्रोणागिरी येथील बीसीटी विद्यालयात रक्षाबंधन

**उरण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विद्यालयात रक्षाबंधन मोठ्या उत्साहात साजरा झाला.

या वेळी रक्षाबंधन सणाचे महत्व सांगत विद्यालयात राखी बनवण्याचा उपक्रम राबवण्यात आला. अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्कृष्ट पद्धतीने राख्या बनवल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबत खेळीमेळीच्या वातावरणात





अनेक उपक्रम राबवत शिक्षनाचे महत्व सांगत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत, मुख्याध्यापिका अनुराधा काठे, सर्व शिक्षक वृंद व इतर कर्मचारी वर्गासोबत मोठ्या उत्साहात रक्षाबंधन साजरा करण्यात आला.

## 'लायन्स सरगम'तर्फे पनवेल पोलीस ठाण्यात रक्षाबंधन

**पनवेल : वार्ताहर**

सरगम लायन्स तर्फे पनवेल शहर पोलीस स्टेशनमधील पोलीस कर्मचाऱ्यांना राखी बांधुन रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.

या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, इतर अधिकारी वर्ग तसेच महिला आणि पुरुष पोलिस कर्मचाऱ्यांना राखी बांधण्यात आली तसेच मिठाई देण्यात आली. या वेळी पत्रकार संजय कदम, बाळु जुमलेदार आणि राजेश डांगळे यांना ही राखी बांधण्यात आली. या कार्यक्रमाला सरगम क्लबचे अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा, सचिव आदित्य दोशी, माजी अध्यक्ष स्वाती गोडसे, मानदा पंडित, संजय गोडसे आदी सभासद उपस्थित होते.



## नांदगाव येथील किराणा दुकानात चोरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील नांदगाव येथील किराणा मालाच्या दुकानात चोरांनी ७ ऑगस्ट रात्री ते ८ ऑगस्ट पहाटे दरम्यान घरफोडी करत वीस हजार रुपये रोख रक्कम आणि दुकानातील पाच हजार रुपये किमतीचा किराणा सामान चोरून नेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. काही महिन्यांपूर्वीदेखील याच दुकानात चोरी झाल्याचे समोर आले आहे.

नांदगाव येथील भावना हुद्दार यांचे सद्गुरू कृपा नावाचे किराणा मालाचे दुकान आहे. अज्ञात चोराने त्यांच्या दुकानाच्या शटरला लावलेले कुलूप तोडले. आणि दुकानात प्रवेश करून दुकानातील २० हजार रुपये रोख रक्कम आणि पाच हजार रुपये किमतीच्या दुकानातील सामान चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ८ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

पनवेल तालुक्यात चोरीचे प्रकार वाढू लागले आहेत. नेरे येथील गावदेवी मंदिरात काही दिवसांपूर्वी चोरी केल्याची घटना उघडकिस आली होती. त्यानंतर नेरे गावातील तीन घरे देखील चोरानी फोडली होती. त्यानंतर नांदगाव येथील दुकानात चोरी करण्यात आली. त्यामुळे त्या चोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली जात आहे.

## फुंडे विद्यालयात विविध उपक्रमांना प्रतिसाद

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्य माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यालयाचे प्राचार्य बी.बी. साळूंखे यांच्या मार्गदर्शनाखाली राखी तयार करणे, पोस्टर मेकिंग, राखी प्रदर्शन, वृक्षाबंधन, क्रांतिदिन असे विविद्य कार्यक्रम झाले.

बहीण भावाच्या पवित्र नाते जपणाऱ्या रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून इयत्ता पाचवी



ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी राखी तयार करणे हा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये १७० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व कलात्मकता वाढविणे तसेच सामाजिक शैक्षणिक व पर्यावरण संबंधित इको क्लब फॉर मिशन लाईफ अंतर्गत वृक्ष संवर्धन विषयावर पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. या मध्ये ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. साऱ्या सजीव सृष्टीचा आधार पर्यावरण आहे वृक्षांनाच भाऊ मानून राखी बांधण्याचा अनोखा उपक्रम झाला.

क्रांती दिनाचे औचित्य साधून क्रांतिवीरांना अभिवादन करण्यात आले. नगमा मन्सूरी, अमृता जाधव, ज्योती महतो, स्वरांजली गोरे यांचे भाषणे झाली. उपशिक्षक आर.जी. शेळके यांनी रक्षाबंधन व क्रांतिदिनाची सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमास विशेष सहकार्य उपशिक्षक एन. के. पाटील, एस. डी. नाईक, एस. डी. म्हात्रे उपशिक्षिका एस. एस. म्हात्रे व सेवकवृंदाचे लाभले.

स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी.बी. साळूंखे व उपस्थित सेवक वृंदाच्या हस्ते भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन वेदिका पाटील व आभार एच.एन. पाटील यांनी मानले.

## पनवेल महापालिकेच्या तिरंगा सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घरो घरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा या मोहिमेअंतर्गत आयुक्त प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत आज रविवार दि. १० ऑगस्ट रोजी 'तिरंगा सायकल रॅली'.चे आयोजन करण्यात आले.या सायकल रॅलीला विविध सायकल क्लबचे तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




राष्ट्रभिमान, देशभक्तीने भारावलेले सुमारे ३०० हून अधिक सायकलस्वार या रॅलीत सहभागी झाले होते. या सर्वांनी तिरंगा अर्थात राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी तिरंगा हाती घेऊन वडाळे तलाव येथून सकाळी सहा वाजता या तिरंगा सायकल रॅलीची सुरुवात झाली. ही रॅली सावरकर चौक-वि. के हायस्कूल-नवीन पनवेल सिग्नल ब्रिज-एचडीएफसी बँक-डी मार्ट-एमटीएनएल ऑफिस पुढे-अदई तलाव -झुडिओ- तेरणा सर्कल (आदई सर्कल)-आय्यपा मंदिर-सीकेटी स्कूल समोरून -पिल्लाई इंजिनीरिंग कॉलेज -विसपुते हॉस्टेल-रेल्वे स्टेशन-अभ्यदय बँक-सिग्नल ब्रिज या मार्गाने पुन्हा वडाळे तलाव येथे रॅलीचा शेवट झाला.

पनवेल सायकलिंग क्लब, रणथॉन सायकलिंग क्लब, केकेसीसी क्लब पेडल वॉरियर्स, इंडियन नेव्ही, वॉन्डरर्स ग्रुप, डीसीसी बेलापूर ग्रुप, स्पिन रोड वॉरियर्स, पनवेल रायडर्स, निसर्गमित्र पनवेल, तिरंगा सायकलिंग, सीबीएसईएफ सायकलिंग असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगर या सायकल क्लबच्या सहकार्याने ही तिरंगा रॅली काढण्यात आली. विविध सायकल क्लब तसेच नागरिकांनीही या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. या वेळी उपस्थितांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली.

## सीकेटी विद्यालयात रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन उत्साहात झाले.

विद्यालयाचे प्राचार्य कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाने रक्षाबंधन कार्यक्रम शनिवारी (दि.९)मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी भावांना राखी बांधून व औक्षण करून त्यांच्या आयुष्याच्या सुख, समृद्धी व आरोग्यासाठी प्रार्थना केली. भावांनीही बहिणींना भेटवस्तू देऊन प्रेम व आपुलकीचा बंध दृढ केला.



या वेळी विद्यार्थ्यांनी रक्षाबंधनाच्या परंपरा व त्यामागील सामाजिक संदेश जोपासला. आजच्या आधुनिक काळात रक्षाबंधन हा भावनिक बंध जपण्याचा नात्यांना आधार देण्याचा आणि परस्पर सन्मान टिकवण्याच्या स्वरूपाचा एक सुंदर उत्सव आहे. असा संदेश विद्यार्थ्यांच्या मनात रुजवून मोठ्या आनंदात हा कार्यक्रम विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीचे सर्व विद्यार्थी, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.

## संपादकीय

# राहुलबाबांचे तेच ते

सातत्याने निवडणुकांमध्ये पराभव पदरी येत असल्याने काँग्रेस नेते राहुल गांधी नैराश्यात गेले असून आपले अपयश लपविण्यासाठी याचे खापर ते निवडणूक आयोगावर फोडत आहेत. त्यांनी नुकतीच इंडिया आघाडीच्या बैठकीत जणू पाठशाळा भरवली आणि निवडणुकांमध्ये हेराफेरी होत असल्याचा आरोप पुन्हा एकदा केला. राहुलबाबांच्या अशा वागण्यामुळे जनतेचे मनोरंजन होत आहे.

**सन २०१४मध्ये केंद्रातील काँग्रेसप्रणित यूपीए अर्थात संयुक्त पुरोगामी आघाडीचे साम्राज्य खालसा होऊन भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए म्हणजेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. तत्पूर्वी यूपीएच्या काळात देशात घोटाळे, गैरव्यवहारांची मालिका सुरू होती. काँग्रेस व सहकारी पक्षांचे नेते आपल्याच विश्वात मश्गूल होते. मी आणि माझे कुटुंब यावर त्यांनी लक्ष्य केंद्रित केले होते. त्यामुळे जनतेला कुणी वाली उरला नव्हता. अशा बिकट परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला अराजकतेच्या खाईतून बाहेर काढत नवी दिशा दाखवली. विकासाचा बॅकलॉग भरून काढत जनतेला दिलासा दिला. मुख्य म्हणजे भ्रष्टाचाराविरोधात कडक पावले उचलत लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान कारभाराद्वारे देशवासीयांची मने जिंकली. याचेच फळ म्हणून देशातील नागरिकांनी त्यांच्याकडे २०१९मध्ये सलग दुसऱ्यांदा नेतृत्वाची धुरा सोपवली. दुसऱ्या टर्ममध्ये मोदी सरकारने आपला वेग आणि कामाची व्याप्ती वाढवत विविध योजना, निर्णय, उपक्रमांमुळे नागरिकांचे जीवनमान सुकर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. परिणामस्वरूप पंतप्रधान मोदींच्या एनडीएवर नागरिकांनी तिसऱ्यांदा विश्वास दाखवत हॅट्ट्रिकची संधी दिली. याशिवाय विविध राज्यांमध्ये भाजप व सहकारी पक्षांच्या युतीला यश आले. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे वर्चस्व दिसून आले. अगदी ग्रामपंचायतींवरही भाजपचा झेंडा डौलाने फडकला. अशा प्रकारे दिल्ली ते गल्ली भाजपचे कमळ फुलले. दुसरीकडे काँग्रेस आघाडीची धुळधाण उडाली. याचे आत्मचिंतन करण्याऐवजी काँग्रेस नेते राहुल गांधी निवडणूक आयोगावर टीका करीत आहेत. लोकशाहीत सर्वांना बोलण्याचा, आपली मते मांडण्याचा अधिकार आहे. म्हणूनच निवडणूक आयोगाने राहुलबाबांना चर्चेसाठी बोलावले, मात्र तिथे न जाता ते आरोप करीत सुटले आहेत. वास्तविक मागील लोकसभा निवडणुकीत एनडीएला अपेक्षित यश मिळाले नव्हते. त्या तुलनेत यूपीएची नवी आवृत्ती इंडिया आघाडीला चांगल्या जागा मिळाल्या. संविधानाचा मुद्दा पुढे रेटून सेट केलेले नरेटिव्ह त्यांना उपयुक्त ठरले. तेव्हा भाजपने ना टीका-टिप्पणी केली, ना निवडणूक आयोगाला जबाबदार धरले. जनतेने दिलेला कौल एनडीएने मान्य केला. यानंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजना आणि तीन पक्षांची एकी या जोरावर भाजप महायुतीला एकाहाती सत्ता मिळाली. तेव्हापासून राहुल गांधी अस्वस्थ झाले आहेत. आपला विजय झाला की लोकशाहीचा विजय आणि दुसरे जिंकले की मात्र ईव्हीएममध्ये घोळ असा दुटप्पी पवित्रा त्यांनी अवलंबिला आहे. जर तुमच्याकडे खरोखरच काही पुरावे असतील तर ते तुम्ही दिले पाहिजेत. नुसते हवेत बाण मारण्यात काय मतलब? निवडणूक आयोगाने राहुल गांधींना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी चर्चेला बोलावले आहे. तेव्हा तिथे जाऊन त्यांनी जे काही वाटते ते सांगितले पाहिजे, मात्र तसे न करता राहुलबाबा बेताल आणि बिनबुडाचे आरोप करीत आहेत. यातून जनतेची चांगलीच करमणूक होत आहे.**


# 'वारसदारी'मुळे किती रक्षाबंधनांना तिलांजली?

**खबरबात**
**विजय मांडे**



बहीण-भावाचं नात म्हटलं की ते अगदी शेवटपर्यंत असायचं मात्र मध्यंतरी जमिनीचे दर वाढले आणि 'वारसदार' म्हणून हक्क गाजविण्याच्या नादात बहीण-भावाच नात तुटले ते इतके विकोपाला गेले की, रक्षाबंधन आणि भाऊबीजा कायमच्या बंद झाल्या. इतकेच नव्हे; तर तोरण आणि मरणदारी सुध्दा येणे-जाणे बंद झाले. मामा-भाचा आदी नातीगोतीपण आयुष्यभरासाठी बंद झाली. कालच झालेल्या रक्षाबंधनाच्या सणात किती रक्षाबंधनांना तिलांजली मिळाली असेल देवच जाणे.

पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. त्यावेळी शेत जमीन घरातील असलेल्या कर्त्या पुरुषाच्या नावावर असे मग कितीही भाऊ बहिणी असल्या तरी घरातील प्रमुख म्हणून त्या कर्त्या पुरुषाच्या नावावर जमीन असली तरी



कुणीही त्यावर आक्षेप घेत नसे. ही जमीन सर्व कुटुंबातील माणसे कसत असत आणि त्यावर आपला उदरनिर्वाह करीत असत. कालांतराने दळण वळणाची सोय झाली आणि ग्रामीण भागातील अनेक जण मुंबई-पुणेकडे नोकरी साठी जाऊ लागले. काही शहरात स्थायिक झाले. त्यांनी शहरात स्वतःची घरे घेतली. काहींनी दुकाने घेतली. मात्र मूळ गावी राहणारा त्यांचा शेती सांभाळणारा भाऊ आयुष्यभर काबाडकष्ट करून शेती करायचा. शिवाय आई वडिलांनाही सांभाळायचा. केवळ सणासुदीला येणारे शहरातील भाऊ व त्यांचा परिवार अगदी पाहुण्यासारखा येऊन राहायचा व सण झाल्यावर लगेचच आपले बिऱ्हाड उचलायचा. त्याची मुले उच्च शिक्षित झाली. काही परदेशात गेली. मात्र गावी शेती करणारा शेतात रबणाऱ्या भावाची मुले कुठे शिकली? काय शिकली? याचे सोयर सुतक त्या शहरात गेलेल्या भावांना नसते. पण एकदा ते निवृत्त झाले की शेती विकून हिस्सा घ्यायला ते पुढे असतात. मात्र त्याने शहरात कमालेल्या संपत्तीतील वाटा गावी असलेल्या भावाला देण्याची त्याला सुबुद्धी होत नाही. खरे तर त्याने काबाडकष्ट केले म्हणून शेती राहिली. याचा विचार केला जात नाही. या प्रकारामुळे भाऊच नाही तर बहिणीही दूर जात आहेत.

पूर्वी कोकणात मनी ऑर्डरची वाट पहावी लागत होती. आता उलट झालय. सरकारने काही जमिनी भूसंपादित केल्याने जमिनीला भाव आला. काही ठिकाणी रेडी रेकनरच्या चार पट भाव मिळाल्याने मुंबईत असलेल्या भावाचा किंवा लग्न होऊन गेलेल्या बहिणीचा हक्क जागा झाला. त्यामुळे आयुष्यभर काबाड कष्ट करून जीवन जगणाऱ्या कोकणातील शेतकऱ्याचे चुकले की काय? असे वाटू लागले. कारण जमीन - जुमला, घर कोंकणात राहणाऱ्या भावाकडे सोपवून मुंबईत अगदी ऐशारामात राहणाऱ्या भावाची त्या जमिनीतील हिस्सा मिळावा म्हणून धडपड सुरू झाली. इतक्या वर्षात जमीन पिकवून किती कमावले असतील? असा अंदाजही हे मुंबईला मजा करणारे भाऊ करू लागले त्याला त्याच्या अर्धांगिनीची साथ ही आहे. दुसरीकडे बहिणीच्या मनात जरी आपल्या काबाडकष्ट करणाऱ्या भावाला हक्कसोड पत्र देऊन जमीन द्यावीशी वाटत असली तरी तिला तिच्या पतीच्या भूमिकेच्या विचार करावा लागल्याने काही ठिकाणी कलह तर काही प्रकरणांमध्ये कोर्ट कचेऱ्या सुरू झाल्या आणि इतकी वर्षे जपलेले भावा - बहिणींचे नाते संपुष्टात आले. त्यामुळे रक्षाबंधन आणि भाऊबीजेला तिलांजली मिळाली हे कटू सत्य आहे.

हे झाले कोकणातील. मुंबई जवळ असलेल्या ठाणे व रायगड जिल्ह्यात तर वेगळाच अनुभव येतो. साधारण बारा - पंधरा वर्षांपूर्वी जमिनीचे दर गगनाला मिळाले अगदी तिप्पट चौपट झाले. विशेषतः रायगड जिल्ह्यात मुंबईकर शेतकऱ्यांनी फार्म हाऊस साठी जमिनी घेणे सुरू केले. त्यासाठी त्यांनी एजंट नेमले आणि व्यवहार होऊ लागले उदाहरण द्यायचे झाल्यास कर्जत, खालापूर तालुक्यासाठी जमीन - खरेदी विक्री करण्यासाठी कर्जतच्या तालुक्याच्या ठिकाणी एकच रजिस्टर ऑफिस होते. तेथे नोंदणी करण्यासाठी येणाऱ्यांची संख्या इतकी वाढली की, तीन - चार दिवस नंबर लागत नसे म्हणून खालापूरला वेगळे व नेरळला वेगळे रजिस्टर ऑफिस सुरू करावे लागले.

हे सर्व व्यवस्थित व्हावे म्हणून गावातील किंवा त्या भागातील एखादा एजंट शोधून त्याच्या करवी व्यवहार करण्याची सुरुवात झाली. यामुळे तालुका-तालुक्यात तसेच गावा-गावात एजंट तयार झाले. त्यातील काहींनी अनेकांना फसवले. तर काही कोर्ट कचेरी केल्यामुळे जेलची हवा खाऊन आल्याची उदाहरणेही खूप आहेत. असे असले तरी एजंट वाढतच आहेत. अनेकांनी यामध्ये पैसे कमाल्यावर किमती गाड्या, टुमदार बंगले, अंगावर अंगभर दागिने केले. त्यांनतर नोटा बंदी आणि कोरोनाच्या काळात त्या बंगल्यांची अवस्था बघण्यासारखीच झाली होती. कित्येकांच्या गाड्या हप्ते न भरल्याने ओढून नेल्या होत्या तर काहींना अंगावरील दागिने सराफांकडे गहाण ठेवण्याची वेळ आली.

विकत घेतलेल्या जमिनी नावावर करताना कित्येकजण आपल्या सख्या भावाला व बहिणीला विसरले काहींनी पैशांचा हव्यासापोटी आपल्या भाऊ, बहीण, आत्या, काकांना जीवंतपणीच स्वर्गात घालविले आहे. तर पूर्वी घरातील कर्त्या व हुशार कुटुंबातील सदस्याच्या नावावर सर्व जमिनी असायच्या मात्र विकताना अन्य भावांचा किंवा वारसांचा



विचार न करता जमीन विकून आपलीच तुंबडी भरण्याचा प्रकारही अनेक ठिकाणी घडला आहे. जमिनीच्या किमती वाढल्याने भावा-भावांमधून विस्तव जात नाही तर भावा-बहिणींचे नाते संपुष्टात आले असून अनेक जण एकमेकांची तोंडेही बघत नाहीत. त्यामुळे जमिनींचे दर वाढले वडिलोपार्जित वारसदारीच्या नादात रक्षाबंधन व भाऊबीज यासारख्या पवित्र परंपरेला तिलांजली मिळाली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आल्या पासून महिलांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे त्या असता मुख्यमंत्र्यांच्या बहिणी झाल्यापासून भाऊ सुध्दा त्यांच्यापासून थोडे वचकून आहेत. त्यामुळे यापुढे वडिलोपार्जित जमिनी मिळण्याची अडचण थोडी दूर होईल असे वाटत असले तरी भाऊ सुध्दा काहीना काही तोडगा काढतीलच हे खरे....



## बदलते तंत्रज्ञान

# ओप्पो के १३ टर्बो मालिकेत इन-बिल्ट फॅन

ओप्पो ऑगस्टमध्ये भारतात त्यांची नवीन के१३ टर्बो सीरीज लाँच करणार आहे. या सीरीजमध्ये, कंपनी ओप्पो के१३ टर्बो आणि के१३ टर्बो प्रो हे दोन स्मार्टफोन लाँच करणार आहे. या फोनमध्ये इन-बिल्ट फॅन असेल. कंपनीचा दावा आहे की हे भारतातील पहिले स्मार्टफोन आहेत ज्यात फॅक्टरी-फिटेड फॅन फोनमध्येच उपलब्ध असेल. या पंख्यामध्ये प्रो-लेव्हल एअरफ्लो डक्ट सिस्टम आणि ७,००० मिमीऑ व्हेपर चेंबरचे संयोजन आहे, जे गेमिंग किंवा जास्त वापर करताना देखील फोन जास्त गरम होण्याच्या समस्येपासून मुक्त होण्यास मदत करते.



**प्रोसेसर आणि कामगिरी**

स्नॅपड्रॅगन ८एस जेन ४ हा घ१३ टर्बो प्रो आणि सामान्य प्रकारात मीडियाटेक डायमेन्सिटी ८४५० चिपसेटमध्ये उपलब्ध आहे. दोन्ही फोनमध्ये ७,००० एमएएच बॅटरी आणि ८० वॅट फास्ट चार्जिंग सपोर्ट मिळेल.

दोन्ही फोनमध्ये ७,००० एमएएच बॅटरी आणि ८० वॅट फास्ट चार्जिंग सपोर्ट असेल.

दोन्ही फोनमध्ये ७,००० एमएएच बॅटरी आणि ८० वॅट फास्ट चार्जिंग सपोर्ट असेल.

**६.८ इंचाची स्क्रीन उपलब्ध असेल**

या स्मार्टफोनमध्ये ६.८ इंचाची स्क्रीन असेल, जी डद्धझड जडएऊ पॅनेलवर बनवली आहे आणि १२०क रिफ्रेश रेटला सपोर्ट करते. स्क्रीनच्या सुरक्षेसाठी ओप्पोचा स्वतःचा क्रिस्टल शील्ड ग्लास यामध्ये बसवण्यात आला आहे.

५० एमपी ड्युअल रिअर कॅमेरा

५० एमपी ड्युअल रियर कॅमेरा आणि १६ एमपी सेल्फी कॅमेरा उपलब्ध असेल. कंपनीने अद्याप त्याच्या किंमती जाहीर केलेल्या नाहीत. परंतु जर आपण चिनी व्हेरिएंटच्या किंमती पाहिल्या तर, के१३ टर्बोची किंमत सुमारे २५,००० रुपये आणि के१३ टर्बो प्रोची किंमत सुमारे ३०,००० रुपये असू शकते.

**मोटो जी८६ पॉवर ५जी स्मार्टफोन लाँच झाला**

टेक कंपनी मोटोरोलाने भारतीय बाजारात बजेट सेगमेंटमध्ये 'मोटो जी८६ पॉवर' हा नवीन स्मार्टफोन लाँच केला आहे. कंपनीने स्मार्टफोनमध्ये ४५०० निट्स ब्राइटनेस असलेला डिस्प्ले दिला आहे. यामुळे दिवसाच्या उजेडातही डिस्प्लेवर प्रकाशाची कमतरता भासणार नाही याची खात्री होईल.

# युवा क्रांतिकारक खुदीराम बोस

**निमित्त**




खुदीराम बोस भारतातील सर्वात तरूण वयाचा क्रांतीकारक म्हणून ओळखले जातात. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी ते हुतात्मा झाला. त्यांचा जन्म बंगालमधल्या मेदिनीपूर जिल्ह्यातल्या बहुवेनी या गावात ३ डिसेंबर १८८९ला झाला. त्यांच्या लहानपणीच आई (लक्ष्मीप्रियादेवी) आणि वडील (त्रैलोक्यनाथ) यांचा मृत्यू झाल्याने त्यांची मोठी बहीण अनुरूपादेवी आणि तिचे पती अमृतलाल यांनी त्यांचे पालनपोषण केले.

बंगाल प्रांताचे विभाजन करण्याचे ब्रिटीश सरकारने १९०३ साली निश्चित केले. सर्वसामान्य लोकांमध्ये नाराजीची तीव्र लाट पसरली. खुदीरामलाही बंगालच्या फाळणीचा निर्णय अन्यायकारक वाटला, देशासाठी काहीतरी करावे असे सारखे वाटू लागल्याने मिदनापूर येथे थोडेफार शिक्षण झाल्यावर त्याने सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला. सरकारच्या विरूद्ध आंदोलने करणाऱ्यांना पकडून कठोर शिक्षा देण्यात येऊ लागल्या. थोड्याच दिवसांत मुझफफरपूरचे मॅजिस्ट्रेट जे क्रांतिकारकांना अमानुष शिक्षा देत, त्यांना मारण्याची जबाबदारी क्रांतिकारकांचे नेते बरींद्रकुमार व उपेंद्रनाथ यांनी खुदीरामवर सोपवली व मदतनीस म्हणून प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती याला मदतीला दिले. ते दोघेही मुझफ्फरपूरमध्ये आले व मॅजिस्ट्रेट किंग्जफ़ोर्ड याच्यावर लक्ष ठेवून संधीची वाट पाहू लागले. न्यायाधीश किंग्ज फोर्डला मारूनच सरकारचा विरोध करण्याचे त्यांनी पक्के केले. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या आनंदमठ या कादंबरीतील 'वंदे मातरम्' या गीताने त्यांनी लोकांमध्ये नवसंजीवनी पसरविली.

खुदीरामने किंग्ज फोर्डला मारण्याची जबाबदारी स्वीकारली. त्याचा सहकारी प्रफुल्ल चक्रवर्ती याच्या सहकार्याने ३० एप्रील १९०५ या दिवशी किंग्ज फोर्ड याच्या गाडीवर बाँब फेकून त्याला मारण्याचे निश्चीत झाले. त्याप्रमाणे एक बाँब फेकण्यात आला, परंतु तो चुकून दुसऱ्याच एका गाडीवर फेकण्यात आल्याने त्या गाडीतील दोन महिला ठार झाल्या. किंग्ज फोर्ड मात्र बचावला. खुदीराम व त्याचा साथीदार यांनी तत्काळ पळ काढला. खुदीराम रातोरात ४० किमी पळाला व बेनी रेल्वे स्टेशनवर आला. भूक लागल्यामुळे तो एका दुकानात चणेफुटाणे घेत असताना तेथील स्टेशनमास्तर पोर्टरला म्हणत होता, 'अरे ही बातमी वाचली का? काल मुझफ्फपुरला दोन मडमांचा खून करून दोघे जण फरारी झाले आहे. त्यांना पकडण्यासाठी वॉरंट सुटले आहे. तेव्हा आता ही गाडी येईल त्यात कोणी सापडते का पहा.' खुदीरामने हे संभाषण ऐकताच, तो एकदम म्हणाला, 'काय, किंग्जफोर्ड मेला नाही.' जवळच्या लोकांना त्याच्या या उद्गाराचे आश्चर्य वाटले व त्यांना शंका आली. त्याबरोबर खुदीरामने तेथून पळ काढला.

घटनेच्या दुसऱ्या दिवशी खुदीराम पकडला गेला, तर प्रफुल्लने अटकेपूर्वीच आत्महत्या केली. खुदीरामजवळ दोन पिस्तुले व ३० काडतुसे सापडली. त्याच्यावर ३०२ कलमाखाली खटला भरुन त्याला फाशीची शिक्षा देण्यात आली. ११ ऑगस्ट १९०८ रोजी हा तरुण वीर हातामध्ये गीता घेऊन व भारतमाता की जय म्हणत हसत हसत आनंदाने फाशी गेला. सशस्त्र क्रांतीत बाँबचा उपयोग करणारा खुदीराम पहिला क्रांतीकारक ठरला. **(साभार : बालसंस्कार)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# डोक्याखाली जाड उशी घेऊन झोपणे नुकसानकारक

झोपताना जास्तीत जास्त लोक डोक्याखाली उशी घेतात. काही लोकांना उशीशिवाय झोपच येत नाही, पण असं करणं आरोग्यासाठी किती नुकसानकारक असतं हे अनेकांना माहीत नसतं. या संदर्भात एमबीबीएस, एमडी जनरल मेडिसिन, सल्लागार फिजिशियन डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी सविस्तर माहिती दिली आहे.



कंटेन्ट क्रिएटर डॉ. मेहस यांच्या मते, उशीचा सतत वापर केल्याने त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात, कारण उशीमुळे चेहऱ्यावर दबाव पडतो. जे लोक उशीचा वापर करत नाहीत, त्यांना ही समस्या होत नाही. उशी न वापरल्याने पिंपल्स येण्याची समस्याही कमी होते, कारण उशीचे कव्हर नेहमी धुतले जात नाहीत. या वेळी डॉ. मेहस यांनी एक व्हिडीओ शेअर करत आपण उशीचा वापर चुकीच्या पद्धतीने कसा करतो हे दाखवलं आहे.

डॉ. पॅलेटी सिवा कार्तिक रेड्डी यांनी उंच उशीवर झोपल्यास तुमच्या त्वचेवर काय परिणाम होऊ शकतो हे स्पष्ट केले आहे. उंच उशी घेतल्यानं सर्वात पहिला आजार म्हणजे मानेचा त्रास. उशी घेतल्याने मानदुखी सतत चालू राहते. यासाठी तुम्ही नेहमी लहान उशी अथवा अत्यंत मऊ उशीचा वापर करावा तसेच उशीमुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होऊ शकतो. डॉ. रेड्डी पुढे सांगतात, सतत उशीच्या वापरामुळे त्वचेला कोरडेपणा, संक्रमण होण्याची अधिक शक्यता असते.

डॉ. रेड्डी खालील शिफारस करतात की, अशी उशी निवडा जी मानेच्या मणक्यावरील ताण कमी करेल. तरीही जर मानेच्या वेदना कायम राहिल्यास डॉक्टरांकडे जाणे फायदेशीर आहे. डॉक्टर रेड्डी सांगतात, अपुऱ्या पद्धतीच्या उशीचा आधार एखाद्या व्यक्तीच्या मणक्यावर गंभीर परिणाम करू शकतो. ही झीज होऊन मानेच्या डिस्क्स आणि सांध्यांवर परिणाम होतो, ज्यामुळे वेदना होतात. उंच उशीचा वापर केल्याने मणक्याची झीज वाढू शकते, ज्यामुळे स्पॉन्डिलेसिस होण्याचा धोका वाढतो. उंच उशीच्या वापरामुळे सतत मानदुखी, डोकेदुखी आणि खांदेदुखी हा रोजचा त्रास उद्‌भवू शकतो. यामुळे झोपेमध्ये व्यत्यय, मूडवर परिणाम होऊ शकतो.

डॉ. रेड्डी यांच्या म्हणण्यानुसार उशीचे प्राथमिक कार्य म्हणजे मानेच्या नैसर्गिक वक्रला आधार देणे. डोके आणि मान तटस्थ स्थितीत ठेवणाऱ्या उशा शोधा. मोठ्या उशीचा परिणाम हा मेंदूतील रक्तप्रवाहावरही होतो. त्यामुळे ही सवय तुम्ही त्वरित सोडावी.

# रायगड जिल्ह्यात दोन अपघातात १५ जण जखमी

## महाडमध्ये दोन एसटी बसची टक्कर; चालकासह १० जण जखमी



**महाड : प्रतिनिधी**

महाड आगारातून सुटलेली महाड सांदोशी आणि माणगाव वरून आलेली माणगाव किल्ले रायगड या दोन एस टी बसेसची समोरासमोर धडक झाली. या अपघातात १० प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

महाडवरून सांदोशी गावाकडे जाणारी एसटी बस (एमएच २० बीएल ३७८१) तर माणगाव वरून किल्ले रायगडाकडे जाणारी एसटी बस (एमएच १४ बीटी १४१६) या दोन बसेस बांधणीच्या माळावर येताच समोरा समोर टक्कर झाली. या अपघातात चालक अविनाश विंचोरकर तर गणपत कदम, सीता कदम, गणेश जाधव, राजाराम लांबर, अपर्णा सूरज शेडगे, पूजा मांडे, स्मिथ मांडे, स्वप्नील उमराटकर, वृषाली संतोष मोरे, सुचिता सुनील धोत्रे हे प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरू करण्यात आले आहेत.

## बोरघाटात ट्रेलर आणि कारच्या धडकेत पाच जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर खोपोली बायपास किमी ३९ च्या दरम्यान नवीन बोगद्यामध्ये कार आणि ट्रेलर यांच्या अपघातात पाच जखमी झाल्याने खोपोली नगरपालीकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात उपचार करण्यात आले मात्र एका महीलेच्या डोक्याला गंभीर दुखापत असल्याने पुणे येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बोहरी कुटुंब पुणे येथून मुंबईस जात असताना सकाळी ११ वा सुमारास हा अपघात घडला. कारला ट्रेलर या अवजड वाहनाने धडक दिल्याने अपघात घडला.यामध्ये नुरुद्दीन शहा ८० जबाब शहा ७७ नसीफा अजब शहा ४५ जानुद्दीन शहा ५५ बुरहान शहा ७ जखमी झाले.



# राकेश जाधव यांची भाजप माणगाव शहराध्यक्षपदी निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते व उतेखोल गावचे रहिवासी राकेश जाधव यांची भाजपच्या माणगांव शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माणगांव तालुका भाजप प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत भाजप तालुकाध्यक्ष परेश सांगले यांनी ही निवड केल्याचे जाहीर केले आहे.

राकेश जाधव हे सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. युवानेते निलेश थोरे यांच्यासमवेत भाजपमध्ये पक्षप्रवेश केल्यानंतर त्यांनी शहरातील विविध घटकांना भाजपासोबत जोडण्याचे काम केले त्याचप्रमाणे पक्षाकडून वेळोवेळी येणारे कार्यक्रम, उपक्रम, आंदोलने यात सक्रिय सहभाग घेऊन पक्षवाढीस हातभार लावला त्यामुळे असा धडाडीचा कार्यकर्ता पक्षाचे शहरातील नेतृत्व समर्थपणे करू शकतो हा विश्वास सगळ्या कार्यकर्त्यांना असल्यानेच त्यांची निवड करण्यात आली असल्याचे परेश सांगले यांनी सांगितले.



राकेश जाधव यांच्या पत्नी सारिका जाधव यादेखील भाजपमध्ये सक्रिय असून मागील नगरपंचायत निवडणुकीत त्यांच्या केवळ २ मतांनी पराभव झाला होता. भाजप नेहमीच काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभी राहत असते व जे कार्यकर्ते पक्षाचं काम पूर्ण निष्ठेने करतात त्यांना पक्ष योग्यवेळी योग्य सन्मान देतो त्याचीच परिणीती म्हणजे ही निवड असल्याचे भाजप युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी सांगितले.

या वेळी महिला मोर्चा प्रदेश सचिव यशोदा गोडबोले, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रुपाली कासारे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रचना थोरे, माजी सरचिटणीस बाबुराव चव्हाण, मंगेश बक्कम, समीर बक्कम, श्रीराम कळंबे, नयन पोटले, राजू तेटगुरे, निखिल साळुंखे, सारिका मेथा, अमोल पवार, महादेव बक्कम,केतन अडीत,समीर पवार, अनिकेत कांबळे, मिलिंद शेलार, अनिकेत साळुंके, उत्कर्ष माडेकर व प्रमुख कार्यकर्ते,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोह्याच्या सार्वजनिक गणेश उत्सवाचे १०४व्या वर्षात पदार्पण

**रोहे : प्रतिनिधी**

एक गाव एक गणेश उत्सव म्हणून ओळख असलेल्या रोहाच्या सार्वजनिक गणेशोत्सवचे १०४ व्या वर्षात पदार्पण झाला आहे.१०४ व्या वर्षाच्या गणेशोत्सवाच्या दरम्यान सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा उत्सव समितीच्यावतीने यंदा मनोरंजनाबरोबरच लोकप्रबोधन व स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणार असून या गणेशोत्सवा काळात भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहाचे अध्यक्ष अमेय जोशी यांनी दिली आहे.

दहा दिवस चालणाऱ्या उत्सवातील संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष अमय जोशी, उपाध्यक्ष प्रीतम देशमुख, कार्यवाह हर्षद भाटे, सहकार्यवाह प्रेषित बारटक्के, खजिनदार चैतन्य आठवले, सदस्य नागेश पाटणकर, भारत वाघचौरे, स्वीकृत सदस्य कुणाल आंबले, सुयोग शेळके, भाटे सार्वजनिक वाचनालय रोहा अध्यक्ष पदसिद्ध सदस्य किशोर तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचे रोहाचे सदस्य परिश्रम घेत आहेत. या ठिकाणी उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

# कर्जत स्टेशनच्या फलाट १ची लांबी वाढवण्याचे काम फेब्रुवारी २०२६पर्यंत होणार पूर्ण

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत रेल्वेस्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबत असल्याने प्रवाशांचे होत असलेले हाल आता होणार नाहीत कारण कर्जत रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक एकची लांबी वाढविण्याचे काम फेब्रुवारी २०२६पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याचे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.

कर्जत रेल्वेस्थानकावर एकूण तीन फलाट व एक इएमयु फलाट आहे. फलाट क्रमांक एक वर मुंबईहून पुण्याकडे जाणाऱ्या गाड्या येत असतात. परंतु या फलाटाची लांबी कमी असल्याने जास्त डबे असलेल्या लांब पल्ल्याच्या गाड्या दोन वेळा थांबविल्या जातात. त्यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे खूप धावपळ व हाल होतात. या गडबडीत अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नुकतेच कर्जत रेल्वे स्थानकावर डब्याची स्थिती दर्शविणारे छोटे इंडिकेटर्स बसविण्यात आले आहेत. दोन वेळा गाडी थांबत असल्याने रेल्वे प्रशासनाला एकाचं ठिकाणी डबे दर्शविणारे दोन इंडिकेटर्स बसवावे लागले आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो व कधी कधी गाडी चुकते तर कधी सामान फलाटावरच राहते.

या होणाऱ्या त्रासाबद्दल कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे फलाट क्रमांक एकची लांबी त्वरित वाढण्याचे काम पूर्ण करावे, अशी विनंती केली होती.

यावर रेल्वे प्रशासकडून सदर कामासाठी ठेकेदाराची नेमणूक केली आहे व सदर कामाला पाऊसामुळे उशीर होत आहे असे ओसवाल यांना कळविले होते. ओसवाल यांनी पुन्हा आपला पाठपुरावा सुरूच ठेवला नंतर सदर काम फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण होइल असे ओसवाल यांना कळविले आहे.

# दिघी येथे एटीएममध्ये गेलेल्या तरुणाचा शॉक लागून मृत्यू

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथे घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने परिसरातील नागरिकांना हादरा बसला आहे. एटीएममध्ये पैसे काढायला गेलेल्या ३० वर्षीय तरुणाचा, एटीएमचा दरवाजा उघडताच विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

मृत तरुणाचे नाव भावेश नरेंद्र पोवळे (वय ३०, रा. कुडगाव, ता. श्रीवर्धन) असे असून, तो ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता दिघी येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेला होता, परंतु एटीएमचा दरवाजा उघडताच अचानक त्याला विजेचा जोरदार धक्का बसला.



गंभीर जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून, विजेचा धक्का कसा लागला याचा तपास सुरू आहे. दरम्यान, या घटनेनंतर नागरिकांना एटीएम वापरताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सुधागडवासीय बाल गोविंदा पथकांसाठी भाजपची ५१ हजारांची दहीहंडी व चषक

**पाली : प्रतिनिधी**

रायगडसह कोकण व महाराष्ट्रात संस्कृती व परंपरेचे वर्षानुवर्षे जतन करणाऱ्या दहीहंडी महोत्सवाचे वेध सर्वानाच लागले आहेत. श्रावणात रक्षाबंधनानंतर येणाऱ्या दहीहंडी उत्सवाकरीता पाली सह रायगड जिल्ह्यात गोविंद पथकांचा उत्साह शिगेला पोहोचला असून पुरूषांबरोबर महिलांच्या पथकांनीही जोरदार सरावाला सुरूवात केली आहे. यंदा दहीहंडीचा सण १६ ऑगस्ट रोजी असून यंदा पाली सुधागडात दहिहंडीचा आगळा वेगळा व भव्य उत्सव व जल्लोष पहावयास मिळणार आहे.

भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई यांच्या संकल्पनेतून व विशेष पुढाकाराने पालीत भारतीय जनता पार्टीच्या वतीने भव्य दिव्य अशा दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा भाजप नेते प्रकाश भाऊ देसाई यांच्या विशेष पुढाकाराने व प्रमुख नेते मंडळी व पदाधिकारी यांच्या संकल्पनेतून पाली सुधागड तालुका भारतीय जनता पार्टी पुरस्कृत भव्य दहीहंडी महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवास



भाजपचे अनेक बडे नेते शुभेच्छा देण्यासाठी पालीत येणार आहेत.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण व वैशिष्ट्ये म्हणजे दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकास दोन लाख २२ हजार २२२ रुपये रोख रक्कमेचे पारितोषिक, आकर्षक चषक व इतर बक्षिसांची खैरात होणार आहे. दोन लाखाची दहीहंडी अधिक लक्षवेधी ठरणार आहे. सुधागडवासीय बाल गोविंदा पथकांसाठी भाजपची ५१ हजारांची मानाची दहीहंडी व आकर्षक चषकदेखील पर्वणी ठरणारे आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिल, **श्री. सुनिल विजयकांत तांबोळी,** राहणार सदनिका क्र. ८१, ए विंग, कल्पतरू वॉटर फ्रंट, पंचमुखी हनुमान मंदिर जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, यांच्या मालकीच्या मौजे बेलोंडाखार, ता. उरण, जि. रायगड येथील भूमापन क्र. ६३, भूमापन क्र. चा उपविभाग ३, भूधारणा पद्धती २, क्षेत्र ० हे. ४० आर. ७ पॉ., पो.ख. ० हे. ०१ आर. ५ पॉ., एकूण ० हे. ४२ आर. २ पॉ., आकार रू. ६.०० पै. या वर्णनाच्या मिळकतीचा मुळ खरेदीखताचा दस्त क्र. ७९८/२०१० हा त्यांच्याकडून प्रवासादरम्यान गहाळ झालेला असून, त्याबाबत त्यांनी दि. ०८/०८/२०२५ रोजी संबंधीत पनवेल शहर पोलिस स्टेशनमध्ये हरवलेल्या मालमत्तेचा तक्रार क्र. १४८९/२०२५ नोंदणी केलेला आहे.

तरी, आमच्या अशिलांच्या मालकीच्या उपरोक्त नमूद वर्णनाच्या जमीन मिळकतीचे मुळ दस्त कोणास सापडल्यास त्यांनी आमच्या अशिलांच्या वरील वर्णनाच्या राहत्या घराच्या पत्त्यावर अथवा त्यांचे वकील म्हणून माझे नोटीसीतील नमूद कार्यालयीन पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन द्यावे, कारण, आमचे अशिलांनी त्यांचे मालकीची सदर जमीन मिळकत बँकेकडे तारण ठेऊन कर्ज घेणेचे ठरविले आहे. त्यामुळे सदर जमीन मिळकतीच्या हरवलेल्या मुळ खरेदीखताच्या दस्ताचा कोणीही, कोठेही गैरप्रकारे वापर करू नये तथा तशा प्रकारे कोणत्याही प्रकारचा सदर जमीन मिळकतीच्या गहाळ झालेल्या मुळ कागदपत्रांचा गैरव्यवहार करण्यास वापर केलेला असल्यास वा सदर जमीन मिळकतीवर कोणाचाही दावा, तारण, गहाण व बोजा असल्यास, त्याबाबत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेपासून ०७ दिवसांच्या आत हितसंबंधी व्यक्तीने वा संस्थेने लेखी स्वरूपात नोटीसीतील नमूद माझे कार्यालयीन पत्त्यावर रजिस्टर्ड पोष्टाने कळवावे, हे या नोटीसीने तमाम जनतेस सुचित करणेत येत आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १०/०८/२०२५

सही/-
**ॲड. अतुल तुकाराम भोपी**
कार्यालय :- बी/८, माणेक नगर को-ऑप. हौ. सोसायटी, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६. मो.नं. ९३२४६७९५०७


# मुरुडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शालेय विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वरदायी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून जोसराजन मंदिराच्या प्रांगणामध्ये नांदले, आगरदंडा, खारआंबोली, उडरगाव, वाणदे, जोसरांजन, शिघ्रे, बौद्धवाडी, तेलवडे येथील



शालेय विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी खूप दूरवरून पायपीट करून शाळा गाठावी लागत असते. आर्थिक परस्थती बिकट असल्याने काही पालकांना सायकल घेणेसुद्धा मुश्किल होऊन बसते. शालेय विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुरुड तालुका अध्यक्ष फिरोज घलटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेरमन मनोज भगत,संचालक अजित कासार,सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, माजी सभापती स्मिता खेडेकर, आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर, प्रीता चौलकर, योगेंद्र गोयजी, राजपुरी उपसरपंच इस्माईल सिद्दिक, तालुका चिटणीस विजय पैर, मुरुड शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, माजी सभापती अशीका ठाकूर, मुरुड तालुका चिटणीस विजय पैर, शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, माजी सभापती अशीका ठाकूर, आगरदांडा उपसरपंच संतोष पाटील, माजी नगरसेविका प्रमिला माळी, दत्ता नाक्ती, संजय ठाकूर, झीनत हसवारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# शिरसाडचे श्री बाणेश्वर मंदिर

माणगाव तालुक्यातील अनेक प्राचीन शिवमंदिरापैकी एक म्हणजेच ऐतिहासिक शिरकाण टप्प्यातील शिरसाड गावातील श्री बाणेश्वर मंदिर....

मराठा शिर्के घराण्याचा मूळपुरूष जेंव्हा निजामपूर पेठ्यातील ८४ गावांवर सत्ता गाजवित होता. त्यावेळेस त्याने वसवलेल्या काही प्रमुख गावांपैकी शिरसाड गावच्या वेशीवर हे शिवमंदिर कित्येक शतकं उभं आहे. दक्षिणेकडून वाहणारी घोडनदी, पूर्वेकडे समोरच लख्ख दृष्टीक्षेपात येणारा किल्ले मानगड, कुंभा घाट,उत्तरेकडून देवघाट शिरवली जिता कडून येणारा मार्ग आणि पश्चिम दिशेला थेट लष्करी



ठाणं कसबे निजामपूर.....अशा भौगोलिक स्थितीत शतकानुशतके शिवभक्तांना आशिर्वाद देणारा हा श्री बाणेश्वर.....

मंदिराबाहेर भव्य दगडी दीपमाळ , आवारात असलेली भग्न शिवपिंड , तसेच मुख्य गाभाऱ्याच्या द्वारपट्टीवर असलेलं कीर्तीमुख मंदिराचा मध्ययुगीन कालखंड दर्शवतो.मंदिराच्या गाभाऱ्यात काही वर्षापूर्वी शाळिग्राम अस्सल नर्मदेतील पाषाणातलं होतं..पण कुण्या अभाग्याने तेही नेलं.आजमितीस नव्याने स्थापित शाळिग्राम, पार्वती मूर्ती,नंदी,गणपतीबाप्पाचे शिल्प पाहायला मिळते.पूर्व आणि उत्तर अशा दोन दिशांना दरवाजा असलेल्या या मंदिराचं वार्षिक व्यवस्थापन बोरवाडीतील ओक कुटुंब करत आहे.सांप्रतची निवाचीवाडी या गावाला पूर्वी गुरवाची वाडी असंही संबोधलं जात असेयाच वाडीत पूर्वी या श्री बाणेश्वराचे पुजारी रामलिंग गुरव , बाळलिंग गुरव वगैरे राहत होते.कालपरत्वे त्यांचे वंशज रोहा शहरात स्थलांतरित झाले. तेव्हापासून बोरवाडीतील परांजपे कुटुंब नित्यनेमाने पूजा करत आहेत.

महाशिवरात्रीला श्रीबाणेश्वर मंदिरात दर्शनासाठी रीघ असते.मूळचे बोरवाडीचे परंतु सध्या विलेपार्ले स्थित डॉ.पंकज ओक आणि त्यांचे कुटुंबीय महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना दर्शन, प्रसादाची उत्तम व्यवस्था करतात. श्री बाणेश्वर मंदिराच्या वार्षिक दिवाबत्तीसाठी आजही मौजे बामणगाव महसूल गावातील काही जमिनीं इनाम दिलेल्या आढळून येतात.

शिरसाड गावातील ग्रामदैवत श्रीकाळभैरव मंदिराच्या अगदी बाजूलाच असलेल्या श्रीबाणेश्वर मंदिरासमोर नैमित्तिक अभिषेकासाठी बारव (पायविहीर) दिसून येते.

**-संतोष सुतार, माणगाव**


## PANVEL MUNICIPAL CORPORATION

**E-TENDER NOTICE (Second Call)**

**VEHICLE DEPARTMENT**

Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel invites quotation tenders through E-tendering system from competent bidders for "Selection of supplier for supply of tyre and bettery for vehicles owned by Panvel Municipal Corporation for a period of three years in Panvel Municipal Corporation". The blank forms and the detailed information regarding tenders will be available on the website www.mahatenders.gov.in from date 11/08/2025 to date 25/08/2025 up to 3.00 PM

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.३८६/३९३/२०२५
दिनांक :- ०८/०८/२०२५

**sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel-410 206**

## निवडक

### ‘त्या’ भोंदूबाबाला अटक

**पनवेल :** शेतातील गुप्तधन काढून देतो असे सांगून ३९ हजार ७० हजारांचे दागिने व रोख रकमेची फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबाला अटक करण्यात आली. त्याच्याकडून सर्व दागिने व रोख रक्कम जप्त करण्यात पनवेल शहर पोलिसांना यश आले आहे. शेतातील गुप्तधन काढून घेण्याच्या बहाण्याने पनवेल येथील एका कुटुंबाचे सोने आणि रोख रकमेची फसवणूक केल्याबाबत भोंदूबाबाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या भोंदूबाबाला पनवेल शहर पोलिसांनी हुपरी, जिल्हा कोल्हापूर येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडील दागिने आणि रोख रकमेची रिकव्हरी करण्यात आली.

### ११ ऑगस्टला लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार ११ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, पहिला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील कार्यालय प्रमुख यांनीच उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे कोंकण विभागाच्या अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) रविंद्र पवार यांनी कळविले आहे.

# ट्रॅफिक समस्या ठरतेय डोकेदुखी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पळस्पे फाटा ते कोन फाटा या रस्त्यावरुन रोजचा प्रवास करणाऱ्या सामान्य जनतेला व छोट्या वाहन चालकांना ट्रॅफिकच्या समस्याला सामोरे जावे लागत आहे. हा तीन ते चार किमीचा प्रवास करणे म्हणजे वाहनचालकांसमोर डोकेदुखी ठरत आहे. याकडे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग व रस्ते महामंडळ यांनी लक्ष देणे काळाची गरज निर्माण झाली आहे.



गेली अनेक वर्षे पळस्पे फाटा ते कोन गाव फाटा रस्त्याच्या दोन्ही बाजूला बेकायदेशीपणे शासनाच्या जागेत अतिक्रमण बांधकामे उभी राहिल्याचे चित्र दिसून येते. याअगोदर बेकायदेशीरपणे अतिक्रमण केलेल्या रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांची शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने पोलीस फौज फाट्यासह अत्यंत कडक सुरक्षेत ही अतिक्रमणे बुलडोझरच्या व इतर कटरच्या साह्याने हटविण्यात आली, परंतु पुन्हा काही बांधकामांची डोके वर काढल्याचे दिसून येते. या रस्त्यावरून ये जा करणाऱ्या अवजड वाहनांमुळे नेहमीची ट्रॅफिकची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक छोट्या वाहन चालकांना अवजड वाहनांची धडक बसून अनेकांचे जीव गेले आहेत. तर वित्तहानी होऊन अनेक जणांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

या रस्त्यावरून उदरनिर्वाहसाठी पनवेल-मुंबईकडे जाणाऱ्या नागरिकांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. याकडे लोकप्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली असून पळस्पे फाटा ते कोन गाव फाटा ट्रॅफिकच्या समस्येतून मोकळा करावा, अशी सर्वसामान्य नागरिकांसह वाहनचालक मागणी करत आहेत.

## ‘नकारात्मकता टाळून कर्तव्यनिष्ठ व्हा’

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील माध्यमिक मराठी विभागाच्या विद्यार्थी परिषदेचे पदग्रहण सोहळ्यावेळी प्रसिद्ध उपक्रमशील आदर्श शिक्षिका स्पृहा सुरेश इंदू यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी नकारात्मकता टाळून कर्तव्यनिष्ठ होण्याचे आवाहन केले.

पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या माजी विद्यार्थी संकेत वैद्य यांच्या संकल्पनेतून दरवर्षी लोकशाही पद्धतीने विद्यार्थी मंत्रीमंडळ निवडले जाते. पारदर्शक निवडणुका होऊन निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परिषदेची स्थापना ख्यातनाम व्यक्तींच्या उपस्थितीत होते. यावर्षी या सोहळ्यास आदर्श उपक्रमशील शिक्षिका स्पृहा सुरेश इंदू आणि संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पृहा इंदू यांनी शाळेत चालणाऱ्या विविध उपक्रमांची, शिस्तबद्धतेची आणि शाळेतील स्वच्छतेची प्रशंसा केली आणि नवीन भूमिकेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कुलसचिव दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना पदभार घेतल्यानंतर येणाऱ्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली तसेच आई वडिलांचे आपल्या जीवनातील महत्व अधोरेखित केले.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक गोरख कदम, श्रीजा नायर, समन्वयक पांडुरंग मुळीक तसेच पालक शिक्षक सभेचे पदाधिकारी दीपाली कुलकर्णी, खोत, इंदलकर आणि सीमा औटी तसेच सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश कुलकर्णी यांनी केले.

## ‘प्रत्येक स्त्रीचे रक्षण ही आपली जबाबदारी’



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील शिक्षण संकुलात केंद्र शासनाच्या ‘हर घर तिरंगा’ विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळेमध्ये विशेष सेल्फी स्टॅण्ड उभारण्यात येऊन ‘हर घर तिरंगा’ या घोषवाक्यासह विद्यार्थ्यांचे फोटो घेण्यात आले.

प्रश्नमंजुषा स्पर्धा, तिरंगा रांगोळी आणि तिरंगा राख्या तयार करण्याचे उपक्रमही राबवण्यात आले. ७ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या तिरंगा राख्या पोलिसांना बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला. या वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रह्मानंद नायकवडी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत राखीचे सांस्कृतिक आणि नैतिक महत्त्व अधोरेखित केले.

आपले कर्तव्य फक्त आपल्या बहिणीपुरते मर्यादित नसून समाजातील प्रत्येक स्त्रीचे रक्षण करणे आवश्यक आहे असे मत ब्राह्मनंद नायकवडी यांनी व्यक्त केले. संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ यांनी रक्षाबंधन या पवित्र सणांचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांनी रावसाहेब चॅरिटेबल ट्रस्टमार्फत सीमेवरील जवानांना राख्या पाठवून खरे राष्ट्रसेवेचे भान ठेवले, असे गौरउद्गार काढले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीजा नायर, मुख्याध्यापक जी. आर. कदम, समन्वयक पी.बी.मुळीक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जगन्नाथ कोळी यांनी मानले.

## बेलोंडेखार येथे कृषी दिन साजरा



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील बेलोंडेखार येथे डॉ.एम.एस.स्वामिनाथन यांच्या १०० व्या जन्मशताब्दी निमित्त ७ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र शासन कृषी विभाग व युएनडीपीजीसीएफ-भारताच्या ताटीय समुदायांची हवामान अनुकूलता वाढवणे या प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात उरण तालूका कृषी अधिकारी अर्चना सुळ-नारनवर, तालुका कृषि यांनी उपस्थित शेतकऱ्यांना डॉ.एम.एस.स्वामिनाथन यांच्या जन्मापासून ते त्यांनी केलेल्या कृषि क्षेत्रातील भरीव कामगिरीबाबत कथन केले. त्यांच्या या कृषि क्षेत्रातील कार्यामुळे आजचा दिवस हा कृषि क्षेत्राकरीता अत्यंत गौरवाचा क्षण म्हणुन गणाला जातो म्हणुन या दिनाचे औचित्य साधुन ७ ऑगस्ट २०२५ हा दिवस महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत शाश्वत शेती दिन म्हणुन साजरा होत आहे.

डॉ.मनोज वहाने, शास्त्रज्ञ, खार जमिन संशोधन केंद्र, पनवेल यांनी शाश्वत शेती दिनाचे औचित्य साधुन सध्य स्थितीत भात पिकावरील किड व रोग व त्यावरील कमी खर्चात होणाऱ्या उपययोजना बाबत मार्गदर्शन केले. तसेच सेंद्रिय शेती काळाजी गरज कशी ते त्यांनी विविध उदाहरणे देऊन शेतकऱ्यांना पटवुन दिले.

पिक उत्तम व दर्जेदार होण्याकरीता मातीचे संवर्धन कसे करावे? तसेच तरुणांनी अर्थिक संतुलन साधुन शेतीला सुरुवात कश्या पदधतीने करावी तसेच कृषि क्षेत्रातील नवनवीन उपक्रम राबविणे बाबत मार्गदर्शन केले व जास्तीत जास्त नवीन उपक्रम राबविणे बाबत आवाहन केले. या कार्यक्रमामध्ये कृषि विभागाचे ए.डी.बुरकुल, उपकृषि अधिकारी नागाव, एस.व्ही लोहकरे, उपकृषिअधिकारी कोप्रोली, नमिता वाकळे, बीटीएम, विभावरी चव्हाण, सहाय्यक कृषी अधिकारी, धनश्री लाड, सहाय्यक कृषी अधिकारी, अदिका पानसरे, वृषाली जाधव, सहाय्यक कृषी अधिकारी, भक्ती म्हात्रे प्रकल्प सहयोगी कृषी आदी कर्मचारी उपस्थित होते.

## उरण तालुक्यात महसूल सप्ताहाला उत्तम प्रतिसाद



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील शेतकरी, नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या महसूल सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी केले होते. आवाहनानंतर आठवडाभर आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहाला शेतकरी, नागरिकांनीही चांगलाच प्रतिसाद दिला.

या सप्ताहाच्या शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत गुणवंत कोतवाल, शिपाई, तलाठी, मंडळ अधिकारी, अव्वल कारकून, नायब तहसिलदार, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी आदी ४५ जणांशी सुसंवाद साधून प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. दुसऱ्या दिवशी कोप्रोली, जासई महसुली मंडळ विभागातील शासकीय भूखंडावरील २०११ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ पात्र असलेल्या २० अतिक्रमणांची पाहणी करण्यात आली. तिसऱ्या दिवशी कोप्रोली महसुली मंडळाच्या विभागातील पिरकोन-पानंद दरम्यानचा अतिक्रमित रस्ता कारवाई करुन मोकळा करण्यात आला.

पिरकोन- पानंद रस्ता,पुनाडे व विंधणे आदिवासी वाडीवरील दुतर्फा रस्त्यावर सावली देणारी ३८ झाडे लावण्यात आली.४ ऑगस्ट रोजी उरण महसुली विभागातील उरण, जाहीर, कोप्रोली मंडळ विभागात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. या अभियानात उत्पन्न ,जातीचे, रहिवासी, ज्येष्ठ नागरिक आदी मिळून ३५१ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तर रेशनकार्ड नसलेल्या नऊ नागरिकांना रेशनकार्डचे वाटप करण्यात आले. पाचव्या दिवशी डिबीटी योजनेंतर्गत २९ लाभार्थ्यांची अधिकाऱ्यांनी घरी जाऊन भेट घेतली. त्यांची केवायसी करण्यासाठी कागदपत्रे जमा करण्यात आली.

## कोपर आणि गव्हाण येथील शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य भेट



**उरण : बातमीदार**

आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळ तर्फे जिल्हा परिषद शाळा गव्हाण आणि कोपर ह्या शाळांमध्ये मंडळाचे संस्थापक सचिन राजे येरुणकर यांच्या वतीने स्पीकर, एमलीफायर मशीन, प्रिंटर आणि माईक देण्यात आले.

या वेळी गव्हाणचे माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, सुहास देशमुख, संदीप पाटील, रोहन खंडू, साई पैकडे, कीर्ती फाटक, रचना येरुणकर, सरिता साळवे, सुप्रिया सावंत, नम्रता मुरकर, संध्या पाटील, सोनाली ठाकूर, सविता दवे आदी उपस्थित होते.

आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळाच्या माध्यमातून नेहमी विविध सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम राबविले जातात. या वेगवेगळ्या उपक्रमातून वेगवेगळ्या विषयावर जनजागृतीसुद्धा केली जाते. त्यामुळे आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळने आयोजित केलेल्या सर्वच उपकमांना जनतेचा नेहमीच उत्तम प्रतिसाद मिळत असतो.

## पनवेलमध्ये महसूल ग्रंथालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील अपर तहसील कार्यालयातील महसूल ग्रंथालयाचे उद्घाटन आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे पाटील, नायब तहसीलदार संभाजी शेलार आदी उपस्थित होते. महसूल ग्रंथालयात सर्वसाधारण पुस्तके, महसूल आणि कायदेविषयक पुस्तके तसेच दररोजचे नियतकालिके असणार आहेत. दररोजचे वर्तमानपत्र, महसूल ग्रंथालयातील पुस्तकांचा अभ्यास करणे शक्य होणार आहे.






**पनवेल : जागतिक आदिवासी दिन पोसरी वाडी येथे साजरा करण्यात आला. या वेळी भाजप गुळसुंदे जि.प. अध्यक्ष अविनाश गाताडे, माजी पं.स.सदस्य जगदीश पवार, पोसरीचे माजी सरपंच बाबुराव रामा शिद, कार्यकर्ते सुजित पाटील, ग्रा.पं.सदस्य सुनीता शीद, पोसरी बूथ अध्यक्ष सचिन भास्कर शिंदे, तुराडे अध्यक्ष प्रतिक भोईर आदी उपस्थित होते.**

# नवी मुंबईत जागतिक आदिवासी गौरव दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

आदिवासी सह्याद्री प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा केला. कोपरखैरणे ते वाशी दरम्यान आदिवासी समाजाच्या माध्यमातून एक भव्य आदिवासी सांस्कृतिक रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत राज्याचे वनमंत्री आणि पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्यासह माजी खासदार डॉ. संजीव नाईक हेदेखील सहभागी झाले होतो. या वेळी सर्व आदिवासी बांधवांना जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



या रॅलीमध्ये मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई आणि इतर ग्रामीण भागातील तरुण-तरुणींनी सादर केलेली पारंपरिक नृत्यं, लोकगीते आणि कलाप्रदर्शन हे विशेष आकर्षण ठरले. यानिमित्ताने महाराष्ट्रातील आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती अनुभवता आली. डॉ. विलास गवारी यांचे आदिवासी समाज : आजची आव्हाने आणि भविष्याची दिशा या विषयावरील प्रेरणादायी भाषण आणि परिसंवाद हेही कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य होते. या भाषणातून आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक परंपरा, हक्क आणि एकतेचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा सन्मान आणि समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात आला.

या वेळी आदिवासी बांधवांना संजीव नाईक यांनी आश्वासित केले की, त्यांच्या सर्व मागण्या व प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी, समाजबांधवांच्या विकासासाठी आणि हक्कांसाठी नाईक कुटुंब नेहमीच त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे असेल. तसेच दरवर्षी आदिवासी दिन नवी मुंबईत साजरा होतो आणि या निमित्ताने भारताची संस्कृती, आदिवासींचे जनजीवन अधोरेखित होते. भारतवर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींना मान सन्मान मिळावा यासाठी आपल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु संपूर्ण भारताचे व आदिवासी समाजाचं नेतृत्व करतात. तसेच महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखाली सर्व आदिवासी बंधू भगिनींना मान सन्मान, अधिकार देण्याचं काम होत आहे, याचा आनंद आहे, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाला आदिवासी सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक रमेश डोळे, माजी नगरसेविका राजश्री कातकरी, माजी नगरसेविका जयश्री ठाकूर, रंजना वाडेकर, चंद्रकांत पांडे, डॉ. प्रफुल विशे, डॉ.विलास गवारी, प्राचार्य संतोष भारमळ, विक्रीकर निरीक्षक विशाल पिचड, जितेंद्र खाडे,सुरेश लाडके, विलास माळुंजे, कॅनरा बँक मॅनेजर अशोक सुपे, ॲड. अरुण शिरसाठ, मेघ मल्हार गृह संकुलन अध्यक्ष तुषार नाईक, सामाजिक कार्यकर्ते विश्वास भारमळ, हिरामण भवारी, दत्तात्रय पोटे, जयंत मडके, दादाभाऊ भांगे, रमेश गावित, दशरथ गंभीरे, सुनील मोहरे, हरिभाऊ उगले, किसन आंबवणे, भिका आढळ, किसन गवारी, सूर्यकांत वायाळ, दगडू भागडे तसेच विविध सरकारी विभागांतील अधिकारी आणि सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




### श्रावणधारा

कृष्णासम रंग घेवूनी नभ आले भरुनी..
ढगांच्या गडगडाटात लखलखली दामिनी..

मेघ लेवूनी अंगावरती मेरू हसू लागले..
झेल घेऊनी मेघधरेचा जलप्रपात नाचू लागले..

चित्रांगण हे कसे ह्या अवनीवरती सजले..
वस्त्र हिरवे चढवूनी तीज नटविले..

मृतिकेच्या गंधात झिंगूनी वाहे अल्लड वारा..
मयूर नाचू लागला काननी फूलवून पिसारा..

फडफड करूनी पंख खग बागडती..
सुंदर हरीणी हिरव्या कुरणी बाळांसह हुंदडती..

मेघ सारूनी तपस जसा डोकावला..
श्रावणात सप्तरंगी इंद्रधनु बिलगला अवनीला..

मंगळागौर, पंचमी, रक्षाबंधन,
जन्माष्टमी, नारळी पूनव संगतीला..
गोडधोडं पंचपकवानाचा मेनु हा पंगतीला..

लेकी, सुना आणि लेकरे निघती देवदर्शनाला..
पूजा अर्चना करूनी प्रसन्न करती देवताला..

बाल गोपाळ मधुर सुरांनी गाती गंमत गाणी..
शेतामधली पिके डोलती झुळझुळ वाऱ्यामधूनी..

हरवून सारे देहभान सांगते मी थेंबांना..
असेच या माझ्या अंगणी...



-साक्षी संदीप आंग्रे, पनवेल

# अनोळखी कामगारांची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

पाली येथील दरोडा उघड झाल्यावर हे आरोपी खालापूर तालुक्यातील वेगवेगळ्या ठिकाणी राहत असल्याचे दिसून आल्याने खालापूर येथे येणारे अनोळखी कामगार, व्यक्ती, भंगार विक्रेते, किंवा फेरीवाले यांची माहिती त्वरीत पोलिसांना द्यावी, असे आवाहन खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.

२६ जुलै रोजी पाली पोलीस ठाणे अंतर्गत हातोंड बौद्धवाडा व गोंदाव या ठिकाणी सशस्त्र दरोडा पडला, यातील आरोपी अजय एकनाथ चव्हाण, आकाश पंजाबराव चव्हाण, सुनिल प्रकाश चव्हाण, मल्हारी भानुदास चव्हाण, सोमनाथ भानुदास चव्हाण, सुजल महेश चव्हाण हे खालापूर तालुक्यातील विविध गावात कामगार म्हणून काम करीत होते, कामाच्या ठिकाणीच ते वास्तव्य करीत असल्याने कुणालाही संशय आला नाही. या दरोड्याच्या तपास कामी पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी जिल्ह्यात १० पथके तैनात केली होती. आठ ते नऊ दिवस अहोरात्र परिश्रम घेवून तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे व गोपनीय माहितीवरुन दरोडेखोर यांना पकडण्यात यश आले, हे दरोडेखोर खालापूर तालुक्यात वास्तव्याला होते हे समजल्यावर खालापूर तालुक्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. यांच्यातील एक आरोपी खेडेगावात जाऊन भाजी विकत असे, आणि त्या गावातील माहिती घेत असे, गावची पूर्ण रेखी करीत असे. त्यानंतर तो इतर दरोडेखोर यांना माहिती देऊन दरोडा टाकण्याची आखणी करीत असे. आता ज्या गावात, ज्या ज्या घरात, इमारतीत, अथवा कामाच्या ठिकाणी वास्तव्य करतात त्या सर्वांची माहिती स्थानिक पोलीस, गाव पोलीस पाटील, ग्राम पंचायत यांच्याकडे देणे आवश्यक आहे. अनोळखी कामगार, व्यक्ती भाडोत्री, अथवा कामगार म्हणून ठेवताना त्याची पूर्ण माहिती घर मालक, ठेकेदार यांनी घेणे आवश्यक आहे, फक्त गाव पोलीस पाटील, अथवा ग्रामपंचायत नाही तर सामाजिक कार्यकर्ते, समाजसेवक, गाव पुढारी यांनीही सतर्क राहणे महत्त्वाचे ठरत आहे. आवाहन खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी केले आहे.

# आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर पेणमध्ये पोलिसांचा रूटमार्च



**पेण : प्रतिनिधी**

आगामी काळात विविध सण, उत्सव असल्याने शहरातील कायदा–सुव्यवस्था बिघडू नये तसेच नागरिकांनी उत्साह आणि आनंदाने सण साजरे करावेत याकरिता पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नारकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप बागुल व पोलीस पथकाच्या वतीने शहरात रूटमार्च व दंगा काबू प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते.

हा रूटमार्च शहरातील महावीर मार्ग, राजू पोटे मार्ग, बाजारपेठ, पेण – खोपोली रोड, नगरपरिषद नाका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, खान मोहल्ला मस्जिद मार्गे पोलीस ठाणे पर्यंत काढण्यात आला होता. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नारकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, यांच्यासह चार पोलीस अधिकारी, २८ अंमलदार व आरएसपी वडखळ येथील ३२ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते. हजर होते.

पेण तालुक्यात विविध सण, उत्सव साजरे होत असताना नागरिकांनी आनंदाने आणि उत्साहाने तसेच शांततेत साजरे करावेत. कोणीही कायदा हातात घेऊ नये, अन्यथा कारवाईला होईल, असे आवाहन पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी सांगितले.



**पेण :** तरणखोप येथील धन्वंतरी क्लिनिक व मेडिकलचे उद्घाटन भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या हस्ते झाले. त्यांचे स्वागत डॉ. स्नेहा तेजस पाटील, पांडुरंग नामदेव पाटील आणि परिवार यांनी केले. या वेळी तरणखोप माजी सरपंच दिनेश पाटील, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान रायगड जिल्हाध्यक्ष संजय पाटील, माजी कृषी सभापती डी.बी. पाटील, दादरचे माजी उपसरपंच मंगेश पाटील, दर्शना पाटील, चंद्रकांत पाटील, पोलीस आनंद पाटील, जिल्हा परिषदेचे एन.जी. पाटील, शेखर पिंगळे, मधुकर पाटील, लक्ष्मी पाटील, नंदा पाटील, अक्षय मिसाळ, सौरभ पाटील आदी उपस्थित होते.

# उसरोलीच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही -आमदार दळवी

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील सर्वात मोठी असणारी ग्रामपंचायत ही उसरोली असून येथील विविध कामांसाठी आतापर्यंत कमी कालावधीत आठ कोटींचा रुपयाचा निधी दिला आहे. उसरोली ग्रामपंचायत मध्ये सर्वाधिक विकासकामे व्हावीत यासाठी यशवंत पाटील यांनी माझ्याकडे विशेष पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच येथे मोठी विकास कामे झाली आहेत.

शिवसेनेच्या सर्व कार्यकर्त्यांनी पक्ष विरहित काम करावे मुरूड तालुक्यातील जनतेने मला मोठे मताधिक्य दिले आहे. येथील लोकांचे विशेष प्रेम लक्षात घेऊन मुरुड तालुका ज्या मतदारसंघात जाईल तेथूनच मी पुढील विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे या वेळी अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.



शिवसेनेचे मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील व ग्रामस्थ यांच्यावतीने आमदार महेंद्र दळवी यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. सदरील कार्यक्रमाचे औचित्य साधून उसरोली ग्रामपंचायतमध्ये विविध विकास कामांचे लोकार्पण सोहळा मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आला. या वेळी आमदार दळवी यांच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण सोहळा झाला.

सदरील कार्यक्रमासाठी शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, जिल्हा संघटिका तृप्ती पाटील,मुरुड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम विभाग अध्यक्ष दिनेश मिणमिने, उप तालुका प्रमुख भगीरथ पाटील, मनोज कमाने, अरविंद गायकर, मुरूड तालुका भाजप अध्यक्ष शैलेश काते, सी.एम.ठाकूर,निलेश घाटवळ, अरविंद भंडारी,आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार दळवी आपल्या भाषणात म्हणाले कि, यशवंत पाटील हा लढवय्या कार्यकर्ता असून जीवनात त्याच्या खूप चढ उतार आले, परंतु तो कधीही डगमगला नाही. अडचणीत सापडलेला लोकांना त्यांनी वेळोवेळी मदत केली आहे. अनेक प्रसंग व अडचणींशी सामना देऊन त्याने स्वतः ला सिद्ध केले आहे. उसरोली येथील आगरी समाज गृह लवकर बांधणार आहोत.यासाठी लवकरात लवकर जागा उपलब्ध करून देण्याचे त्यांनी सांगितले.उसरोली ग्रामपंचायतच्या मागील सरपंच यांनी नाहरकत दाखल न दिल्याने येथील कामे रखडली होती. आगामी काळात विकास कामाच्या आड येणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवलं जाईल असा इशारा यावेळी त्यांनी दिला. यशवंत पाटील यांनी लढत राहावे मी सदैव त्याच्या पाठीशी खंबीर उभा राहणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

या वेळी मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील यांनी सांगितले कि, आमदार दळवी यांच्या सहकार्यामुळेच मी विकासकामे करण्यात यशस्वी झालो. उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील लोकांनी हि ग्रामपंचायत शिवसेनेच्या ताब्यात द्यावी आगामी काळात येथील लोकांना विकासच विकास दिसणार आहे. ग्रामपंचायतच्या विकास कामांसाठी आमदार दळवी यांनी जो आठ कोटी रुपयांचा निधी दिला त्याबद्दल त्यांनी विशेष ऋण व्यक्त केले. कार्यक्रमास असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# समाजाचा विकास करण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे –विशाल पवार

## खालापुरात जागतिक आदिवासी दिन साजरा

**चौक : प्रतिनिधी**

शिक्षणाशिवाय प्रगती नाही, कुठल्याही क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे असल्याने प्रत्यक आदिवासी बांधव यांनी शिक्षणात प्रगती केल्यास समाजाचा उद्धार होईल, असे प्रतिपादन चौक दूर क्षेत्र प्रभारी पोलीस उप निरीक्षक विशाल पवार यांनी केले.



खालापूर तालुका आदिवासी समाज यांच्या वतीने जागतिक आदिवासी दिन मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात आला, कार्यक्रमाची सुरुवात मुंबई पुणे रस्त्यावर नढाल येथील काळंबा देवी मंदिराच्या आवारात करण्यात आला.

या वेळी आदिवासी क्रांतिकारक यांच्या प्रतिमांचे पूजन आणि पुष्पहार अर्पण माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे, सरपंच प्रफुल्ल विचारे, आदिवासी समाज अध्यक्ष अनंता वाघमारे, उपाध्यक्ष राजू सुतक,सचिव दिलीप डाके, खजिनदार संजय पवार,माजी सरपंच विष्णू खैर, नितीन तवले यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी चौक प्रभारी विशाल पवार बोलत होते.

आदिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिवस दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जगभरातील आदिवासी बांधव यांच्या हक्कांचे रक्षण आणि जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा करण्यात येतो. आदिवासी लोकांचे हक्क आणि त्यांचे महत्त्वाचे योगदान मान्य करण्यासाठी जागतिक स्तरावर सुरू असलेल्या प्रयत्नांनंतर, जागतिक आदिवासी दिन २०२३ पहिल्यांदा साजरा करण्यात आला. जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ६ टक्के लोकसंख्या ही आदिवासी बांधव यांची आहे. विविध सांस्कृतिक रीतिरिवाजांचे मूळ मालक असूनही, आदिवासी गटांना सामान्यतः गैरसोयींना तोंड द्यावे लागते. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकारांच्या संवर्धन आणि संरक्षणावरील उप–आयोगाच्या आदिवासी लोकसंख्येवरील कार्यगटाची १९८२ मध्ये जिनिव्हा येथे पहिली बैठक झाली, म्हणूनच जगातील आदिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिन निवडण्यात आला. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने डिसेंबर १९९४ मध्ये जागतिक आदिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिन औपचारिकपणे ओळखला आणि साजरा केला.

या ठरावाचे मुख्य उद्दिष्ट आदिवासी लोकसंख्येचे हक्क राखणे आणि त्यांची मते आणि आवाज ऐकले जातील याची हमी देणे हे होते. या वेळी बाईक रॅली काढण्यात आली. मोहोपाडा, वावोशी, खालापूर चौक, खोपोली येथून आदिवासी बांधव यांनी पारंपरिक आदिवासी पेहराव परिधान करून सामील झाले होते, खालापूर येथे आदिवासी भवन मध्ये वंदन करून खुल्या मैदानात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाच, गाणी सादर करण्यात आली. या वेळी शिक्षण क्षेत्रात प्रगती केलेल्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

लोधीवली उप सरपंच सदानंद हंबीर, चौक ग्रा. पं. सदस्य महादेव पिरकट, नारायण निरगुडे, मंगळ पोकळ, राजू उघडा, सुनील बांगरे, रवी बांगरे, राम शिंगवा, जयेश पारधी, रवेश निरगुडा, रमेश खैर, रामदास पवार, कमलू पारधी, गोविंद पिरकट, संदीप भस्मा, सखाराम डूमने, मंगेश डूमने, माजी जिल्हा परिषद सदस्य रंजना पवार यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते, आज तुफान पाऊस सुरू आहे, तरीही भर पावसात बाईक रॅली सुरू होती, या वेळी वाहतूक व चौक पोलीस यांनी वाहतूक सहकार्य केले.

# पडम येथे नारळी पौर्णिमा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील पडम कोळीवाडा येथे नारळी पौर्णिमा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

सायंकाळी गावातील दैवताची आरती करून मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. पाश्यमात्य वाद्यवृंद डीजेवर मिरवणूक काढण्यात आले. कोळी बांधवांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करुन नारळी पौर्णिमा सणानिमित्ताने काढलेल्या मिरवणुकीत सामिल झाले होते. कोळी गीतांवर युवांसह महिलांनीसुद्धा ठेका धरला होता.

या वेळी नारळाचे वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती. कुंडलिका नदीला पडम कोळी बांधवांच्यावतीने नारळ अर्पण करण्यात आले. नारळी पौर्णिमा सणा निमित्ताने कोळी समाज बांधवांमध्ये उत्साह दिसून आले.



# नेणवली शाळेत पर्यावरणपूरक रक्षाबंधन

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील नेणवलीच्या जिल्हा परिषद शाळेतील मुलांनी यंदाचा रक्षाबंधन सण अत्यंत अनोख्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा केला. नेहमीप्रमाणे हाताने तयार केलेल्या राख्या एकमेकांना बांधण्याऐवजी, मुलांनी स्वतः बनवलेल्या पर्यावरणपूरक राख्या वृक्षांना बांधून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश दिला.



या उपक्रमात शाळेतील सर्व मुलांनी उत्साहाने भाग घेतला. मुलांनी टाकाऊ वस्तूंपासून आणि नैसर्गिक साहित्यापासून सुंदर राख्या तयार केल्या. या राख्यांमध्ये प्लास्टिकचा वापर टाळण्यात आला होता. त्यानंतर, या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या परिसरात लावलेल्या झाडांना या राख्या बांधून वृक्ष जोपासण्याचा वसा घेतला.

या वेळी मुलांनी 'वृक्ष हाच खरा भाऊ, पर्यावरणाचे रक्षण हाच खरा सण' असा संदेश दिला. झाडांप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे संरक्षण करण्याची शपथही मुलांनी घेतली. या अनोख्या उपक्रमामुळे मुलांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण झाली असून, इतरांनाही त्यातून प्रेरणा मिळेल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.ह्या उपक्रमासाठी विषय शिक्षक रवींद्र हंबीर ह्यांनी मुलांना सहकार्य लाभले.

मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके ह्यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि सांगितले की, अशा उपक्रमांमुळे मुलांना लहानपणापासूनच पर्यावरणाचे महत्त्व समजेल आणि ते जबाबदार नागरिक बनतील.

# खोपोली येथे मांजर दिवस

**चौक, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली येथे आंतरराष्ट्रीय मांजर दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी मांजर प्रेमी यांनी आपल्या मांजरासह उपस्थिती लावली.

ज्यांच्या आयुष्यात मांजर म्हणजे प्रेम, साथ, आणि आनंदाचं प्रतीक आहे, अशा मांजर प्रेमींसाठी आंतरराष्ट्रीय मांजर दिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे खोपोली येथे श्री कृपा एक्वेरियम व पेट केअर सेंटर येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. संपूर्ण दिवसभर चाललेल्या या आयोजनात शेकडो मांजर प्रेमींनी आपल्या लाडक्या मांजरांसह सहभाग घेतला.

या निमित्ताने मांजरांसाठी विविध नामांकित कंपन्यांकडून मोफत फूड सॅम्पल्स, सप्लिमेंट्स आणि अन्य आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. मांजरांच्या आरोग्य, आहार आणि सुदृढतेसाठी पशुवैद्यकीय तज्ञांकडून मार्गदर्शन देखील करण्यात आले.

श्री कृपा एक्वेरियम व पेट केअर सेंटरच्या या आयोजनात हेल्प फाउंडेशनचे सदस्यांनीदेखील मोलाचे सहकार्य केले.




# इंदापूरच्या निकम स्कूलमध्ये रक्षाबंधन



**माणगाव : प्रतिनिधी**

एस. एस. निकम इंग्लिश स्कूल, इंदापूर येथे दिनांक ९ ऑगस्ट २०२५, शनिवार रोजी रक्षाबंधन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याची सुरुवात लेझीम आणि वाद्याच्या गजरात मान्यवरांचे स्वागत करून करण्यात आली.

इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली राखी शाळेतील वृक्षाला व आमंत्रित मान्यवर माजी सैनिक कैप्टन एन एस रंधावा, संतोष तावडे, शाम सापळे, स्वप्निल वाघ व सचिन वाघ यांच्या हस्ते बांधण्यात आली. इयत्ता ८, ९ आणि १० वी च्या मुलींनी माजी सैनिक बांधवांसह तळाशेत (इंदापूर) ग्रामपंचायतीतील सफाई कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

माजी सैनिकांनी आपल्या प्रेरणादायी अनुभवांमधून विद्यार्थ्यांना देशप्रेम, शिस्त, सेवा भावना, ध्येय निष्ठा आणि कर्तव्यपरायणतेची प्रेरणा दिली. या वेळी त्यांनी त्याग, जबाबदारी आणि देशभक्ती यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

या सोहळ्याला शाळेच्या मुख्याध्यापिका रंजिता जाधव, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका, संचिता जाधव, पूर्व प्राथमिक विभागाच्या इन्चार्ज संपदा पाटील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन निलम जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेच्या मुख्याध्यापिका रंजिता जाधव यांनी केले.

हा कार्यक्रम सैनिकांच्या शौर्याचा, सेवाभावाचा आणि गावातील स्वच्छता रक्षकांच्या निस्वार्थ कष्टांचा गौरव करणारा ठरला. पूर्व प्राथमिक ते इयत्ता १० वी पर्यंतच्या सर्व वर्गांमध्ये रक्षाबंधन सोहळा आनंदात व उत्साहात साजरा झाला.

# यश दयालवर बंदी

## यूपी टी-२० लीगमध्ये खेळण्यास मनाई



**लखनऊ : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी)चा वेगवान गोलंदाज यश दयालच्या अडचणींमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. बलात्काराच्या प्रकरणात अडकलेल्या यशला एका मोठ्या लीगमधून वगळण्यात आले आहे. त्याच्यावर १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे.

यश दयाल हा आयपीएल २०२५च्या विजेत्या आरसीबी संघाचा भाग होता. त्याने या हंगामात चांगली कामगिरी केली आणि १५ सामन्यांमध्ये १३ विकेट्स घेतल्या, परंतु आता त्याची कारकीर्द अडचणीत आहे.

रिपोर्ट्सनुसार, आरसीबीचा वेगवान गोलंदाज यश दयालला यूपी टी-२० लीगमध्ये खेळण्यास बंदी घालण्यात आली आहे. यूपी क्रिकेट असोसिएशनने (यूपीसीए) हा निर्णय घेतला आहे, ज्यामुळे हा वेगवान गोलंदाज पुढील हंगामात खेळू शकणार नाही.

जयपूरच्या सांगानेर सदर पोलीस ठाण्यात यश दयालविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर यूपीसीएने हा निर्णय घेतला आहे. यशलवर १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे.

रिपोर्ट्सनुसार यूपी टी-२० लीग संघ गोरखपूर लायन्सने या वेगवान गोलंदाजाला ७ लाख रुपयांना खरेदी केले होते, परंतु आता तो या लीगमध्ये खेळू शकणार नाही. यादरम्यान, यशला राजस्थान उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे.

बलात्कार प्रकरणात यश दयालला राजस्थान उच्च न्यायालयाकडून कोणताही दिलासा मिळालेला नाही. न्यायालयाने या प्रकरणात त्याची अटक आणि पोलीस कारवाई थांबवण्यास नकार दिला. न्यायालयाने म्हटलं होते की हे प्रकरण अल्पवयीन मुलीशी संबंधित आहे, त्यामुळे स्थगिती देता येणार नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ ऑगस्ट रोजी होईल.

### दोघींकडून लैंगिक शोषणाचा आरोप

यश दयालविरुद्ध पहिला गुन्हा गाझियाबादमध्ये दाखल झाला होता. यशने गाझियाबादमधील एका महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिचे लैंगिक शोषण केल्याचे सांगण्यात आले, पण अलाहाबाद उच्च न्यायालयाने या प्रकरणात यशची अटक थांबवली होती. त्यानंतर जुलैच्या सुरुवातीला जयपूरमध्ये यशविरुद्ध खटला दाखल करण्यात आला. या वेळी राजस्थान उच्च न्यायालयाने अटकेला स्थगिती देण्यास नकार दिला आहे.

# मांडवा येथील राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कल्याणचा कलानिकेतन आखाडा विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील मांडवा येथे टाकादेवी स्पोर्ट क्लब व ग्रामस्थ यांच्या विद्यमाने राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी कलानिकेतन कोनगाव कल्याण आखाडा ठरला, तर आव्हानाची कुस्ती महाराष्ट्र केसरी वेताळ शेळके (पुणे) याने जिंकली. त्याला एक लाख ६३ हजार रुपये आणि मानाची गदा देण्यात आली.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत रायगड जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर अशा महाराष्ट्रातील विविध भागातून कुस्तीपटू सहभागी झाले होते. मांडवा बंदर येथे नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून सुमारे २५० कुस्त्या खेळवण्यात आल्या. विशेष म्हणजे महिलावर्गाच्याही कुस्त्या झाल्या.

### पुण्याच्या वेताळ शेळकेने जिंकली आव्हानाची कुस्ती



द्वितीय क्रमांक पिंपळस ठाणे आखाडा व तृतीय क्रमांक जय हनुमान व्यायामशाळा वडगाव आखाडा यांनी प्राप्त केला. तिन्ही विजेत्यांना भव्य ट्रॉफी देण्यात आली. आव्हानाची कुस्ती वेताळ शेळके (काका पवार तालीम, पुणे) विरुद्ध धनाजी कोळी (हनुमान आखाडा, पुणे) यांच्यामध्ये चुरशीची झाली.

स्पर्धेचा शुभारंभ रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, प्रा. प्रमोद भगत, नरहरी तोडणकर, अभिलाष माळवी, राजेंद्र वाकडे, मंडळाचे मंडळाचे अध्यक्ष केशव पाटील, उपाध्यक्ष अशोक घरत, सल्लागार गजानन पाटील, सुनील म्हात्रे आदी उपस्थित होते.

स्पर्धेत प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेंद्र दळवी, भाजप राज्य सरचिटणीस राजू साळुंखे, शिवसेना नेते दिलीप भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस अलिबाग मुरूड विधानसभा अध्यक्ष अमित नाईक, ॲड. प्रवीण ठाकूर, उद्योजक अभिलाष मालवी, क्रीडा क्षेत्रातील सुभाष घासे, जयेंद्र भगत तसेच माजी पं.स. सदस्य रणजीत राणे आवासचे माजी सरपंच अभिजित राणे यांच्यासह सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.





# न्यूझीलंडचा ऐतिहासिक कसोटी विजय

**बुलावायो : वृत्तसंस्था**

वेगवान गोलंदाजांच्या भेदक माऱ्याच्या जोरावर न्यूझीलंडने यजमान झिम्बाब्वेचा दुसऱ्या कसोटी सामन्यात एक डाव आणि ३५९ धावांनी धुव्वा उडवला. क्वीन्स स्पोर्ट्स क्लबवर झालेला हा सामना तिसऱ्याच दिवशी जिंकत न्यूझीलंडने दोन सामन्यांची मालिका २-०ने खिशात घातली. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा विजय ठरला आहे.

न्यूझीलंडने आपला पहिला डाव ३ बाद ६०१ धावांवर घोषित केल्यानंतर विजयासाठी डोंगरएवढे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या झिम्बाब्वेच्या फलंदाजांनी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा दुसरा डाव अवघ्या ३७.४ षटकांत ११७ धावांवर संपुष्टात आला. न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच झिम्बाब्वेच्या फलंदाजांवर दडपण आणले. आपला पहिलाच कसोटी सामना खेळणाऱ्या फोक्सने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले. त्याने एकामागोमाग एक पाच बळी घेत झिम्बाब्वेचा डाव गुंडाळण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने दुसऱ्या डावात ३७ धावांत पाच बळी घेतले, तर सामन्यात एकूण ७७ धावांत नऊ बळी घेण्याची किमया केली. झिम्बाब्वेकडून तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या निक वेल्चने एकाकी झुंज दिली. त्याने नाबाद ४७ धावांची खेळी केली, पण दुसऱ्या बाजूने त्याला समर्थ साथ मिळाली नाही.




सौजन्य : सौ. नेत्रा पाटील (माजी नगरसेविका)



सौजन्य : श्री. अमित जाधव (जिल्हाध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा अनुसूचित जाती मोर्चा)


# गावातील मुलाला आले कोहली, डिव्हिलियर्स, रजतचे कॉल

**रांची : वृत्तसंस्था**

छत्तीसगढच्या गारियाबाद जिल्ह्यातील मडगाव देवभोग येथील मुलाबरोबर चित्रपटात एखादा स्वप्नवत किस्सा घडतो, तसेच काहीसे घडले. मनिष बीसी आणि खेमराज या मित्रांना रजत पाटीदारचा जुना फोन नंबर अलॉट करण्यात आला होता.

२८ जूनला मनिषने रिलायन्स जिओचे नवे सिम कार्ड खरेदी केले. यानंतर त्याने सर्व प्रक्रिया पूर्ण केली आणि व्हॉट्सॲप डाऊनलोड केले. व्हॉट्सॲपवर पाहतो तर काय रजत पाटीदारचा प्रोफाईल फोटो होता. त्यांना सुरुवातीला वाटले की काहीतरी टेक्निकल प्रॉब्लेम असावा. यानंतर नवीन नंबरवर कॉल यायला सुरुवात झाली, पण हे कॉल मोठ्या क्रिकेटपटूंचे आणि त्यांच्यासंबंधित व्यक्तींचे होते.

एकाने कॉलवर विराट कोहली असल्याचे म्हटले, तर एकजण एबी डिव्हिलियर्स असल्याचे म्हणाला. या दोन्ही मित्रांना सुरुवातीला कोणीतरी मस्करी करतंय वाटते होते. १५ जुलैला मनिषला अजून एका नंबरवरून कॉल आला आणि कॉल करणाऱ्या व्यक्तीने म्हटले, मी रजत पाटीदार बोलतोय, हा माझा नंबर आहे; प्लीज मला परत करा. यावर मनिष व त्याच्या मित्राला मस्करी सुरू असल्याचे वाटले आणि ते म्हणाले हो आम्ही एमएस धोनी बोलतोय.

रजतने त्यांना समजावले की हा माझा जुना नंबर आहे आणि तो मला माझे मित्र, कोच, क्रिकेटपटूंना कॉल करण्यासाठी आवश्यक आहे, पण समोरून मस्करी सुरू असल्याने तो म्हणाला, मी पोलिसांना पाठवतो. १० मिनिटांत पोलीस दाखल झाले. त्यानंतर दोघेही मित्र थबकले आणि त्यांनी लगेच सिम कार्ड परत दिले.


लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित



रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा




भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी भजन स्पर्धेचे आयोजन!
रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे!

शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५.
वेळ - सकाळी ९.०० ते सायं. ७.००
स्थळ - श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल. प्लॉट नं. ४७५. मार्केट यार्ड.पनवेल.

प्रवेश अर्ज

१) भजन मंडळाचे नाव ____________________
२) भजन स्पर्धक मंडळाचा पत्ता ____________________
____________________
३) संपर्क क्रमांक ____________________
४) गायकाचे नाव ____________________
५) मृदंग वादकाचे नाव ____________________
६) तबला वादकाचे नाव ____________________

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५.

पुरुष खुलागट - महिला खुलागट

| प्रथम पारितोषिक | द्वितीय पारितोषिक | तृतीय पारितोषिक | उत्तेजनार्थ पारितोषिक |
| --- | --- | --- | --- |
| ५१,०००/- सन्मानचिन्ह | २५,०००/- सन्मानचिन्ह | १५,०००/- सन्मानचिन्ह | ७,०००/- सन्मानचिन्ह |

| उत्कृष्ट पखवाज वादक | उत्कृष्ट तबलावादक |
| --- | --- |
| ७,०००/- सन्मानचिन्ह | ७,०००/- सन्मानचिन्ह |

स्पर्धा संपन्न झाल्यानंतर लगेचच स्पर्धेचा निकाल जाहीर करून बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क

सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा पाटील - ७७१५८३५४२४, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५, चंद्रकांत मने - ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर - ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे ९३२६८१२१९६, पुनमताई ठाकूर - ७२०८७७६००५, पवन राजे - ९२२१०९७३३७, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३, अनिल कोळी - ९१६७४७४५०७, मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३, डॉ. शैलेश वाजेकर - ९८६७२९६८५०

स्पर्धेची नियमावली

१) भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्यात होईल.
२) प्राथमिक फेरी हि ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येईल.
३) प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळींना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल.
४) प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ 9167474507 या नंबरवर व्हॉट्सअप करावा. सदर व्हिडिओ आणि मंडळाची माहिती (मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे इत्यादी, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी).
५) अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी ६ जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा.
६) अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी फक्त २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे.
७) श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक आहे.
८) सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संताचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत चालणार नाहीत) अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये,
९) निवड झालेल्या मंडळींनी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे.
१०) व्यासपीठावर बसण्याच्या अगोदरच आपापली वाद्ये सुरात मिळवून ठेवावीत. फक्त आवाज तपासून घेण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
११) स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये आपण स्वतःची आणावी.
१२) तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण ७ जण असावेत.
१३) प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल.
१४) परिक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहिल. परिक्षकांबरोबर कोणत्याही कारणाने वाद घालता येणार नाही.
१५) आवश्यक असल्यास इतर काही नियम कार्यक्रम स्थळी समजविण्यात येतील.
१६) प्राथमिक फेरीत भाग घेतल्यानंतर फोन करुन विचारणा करु नये. अंतिम यादी प्रसारीत करण्यात येईल.
१७) स्पर्धेतील गायक, वादक, चकवा वादक किंवा कोणतेही कोरस दुसऱ्या मंडळात सहभागी होवू शकणार नाही.
१८) पारंपारिक भजनातील साहित्याचा वापर करता येईल. (इलेक्ट्रॉनिक तानपु-याचा वापर करावयास हरकत नाही.)
१९) भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख असावा.

सुचनाः भजन स्पर्धेत सहभागी झालेल्या मंडळाचे सादरीकरण कसे झाले याबद्दल परिक्षक LIVE समिक्षा करतील. तसेच सहभागी झालेल्या कलाकारांना योग्य त्या प्रतिक्रिया आणि आवश्यक असल्यास सुचना करतील, जेणेकरुन त्यांना प्रोत्साहन मिळेल, शिवाय निकाल देताना पारदर्शकता जपता येईल.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com